
# मालती माधव



IRBK-0103660
IRBK-0103660

...के.समर्थ-सदन गिरगांव मुंबई.

ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
...षय का. वा
3660




# मालती माधव

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्र. क्र. ३६६० नों. दि.
ग्र. का. वा. क्र.

लेखक
महादेव काशीनाथ कारखानीस, बी. ए.,
माजी प्रिन्सिपल, ट्रेनिंग कॉलेज, धुळें

IRBK-0103660
IRBK-0103660

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव-मुंबई

मूल्य सहा आणे

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

प्रथमावृत्ति : १९४०
पुनर्मुद्रण : १९४५, १९५१

मुद्रक : बा. ग. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार, मुंबई २
प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थसदन, गिरगांव, मुंबई ४

## प्रारंभींचे चार शब्द

प्रसिद्ध संस्कृत कवि भवभूति याच्या ' मालतीमाधव ' ह्या सुंदर नाटकांतील कथा थोडक्यांत पुढें दिली आहे. भवभूति हा विद्वान् कवि इ. स. च्या आठव्या शतकांत होऊन गेला. तो वऱ्हाडांतील पद्मपूर येथील राहणारा होता. भवभूतीनें ' महावीरचरित ', ' उत्तररामचरित ' व ' मालतीमाधव ' अशीं ३ नाटकें लिहिलीं. पहिल्या दोन नाटकांत त्यानें श्रीरामाचें चरित्र वर्णिलें आहे. ' मालतीमाधव ' हें अगदीं स्वतंत्र नाटक आहे. सुमारें ७५ वर्षांपूर्वीं ह्या नाटकाचें रूपान्तर कृष्णशास्त्री राजवाडे ह्यांनीं मराठींत केलें होतें.

भवभूतीला जरी बाराशें वर्षें होऊन गेलीं, तरी त्याची कीर्ति कमी झाली नाहीं. ' उत्तररामचरित ' व ' मालतीमाधव ' हीं त्याचीं दोन नाटकें अजूनही अत्यंत लोकप्रिय आहेत.

' निवास '
डेक्कन जिमखाना, पुणें.
१ ऑगस्ट, १९४०

म. का. कारखानीस

---

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | विद्यालयांतील मैत्री | ५ |
| २. | बागेंतील भेट | ११ |
| ३. | शिवालयांतील बेत | १४ |
| ४. | मालतीची संकटांतून सुटका | २५ |
| ५. | गुप्त भेट | ३१ |
| ६. | नंदनाची पत्नी | ३५ |
| ७. | प्रतिज्ञा पुरी झाली | ४३ |




'अग बाई ! मला लवंगिकेनें फसविलें !'

[ पृष्ठ २३

ग्रंथालय, 
अनुक्र. 2966
विभाग वा वा
१९४९
3-2-49

# मालतीमाधव

## – १ –

## विद्यालयांतील मैत्री

सध्यां ज्याप्रमाणें मुंबई, पुणें, वगैरे मोठमोठ्या शहरांत कॉलेजें आहेत व तेथें विद्यार्थी व विद्यार्थिनी एकत्र अभ्यास करतात, त्याचप्रमाणें प्राचीन काळीं आपल्या ह्या भरतखंडांत मोठमोठीं विद्यालयें होतीं व तेथें विद्यार्थी व विद्यार्थिनी एकत्र अभ्यास करीत असत. ज्याला आपण सध्यां वऱ्हाड म्हणतों, त्या प्रांताला प्राचीन काळीं 'विदर्भ देश' असें म्हणत असत. हा विदर्भ देश विद्येकरितां फार प्रसिद्ध होता. ह्या विदर्भ देशांत पद्मावती नगरीच्या जवळ एक मोठें विद्यालय सर्व भरतखंडांत प्रसिद्ध होतें. तेथें अभ्यास करण्याकरितां दूरदूरचे विद्यार्थी व विद्यार्थिनी येत असत.

ह्या विद्यालयांत देवरात व भूरिवसु ह्या नांवाचे दोन तरुण विद्यार्थी अभ्यास करीत होते. बरींच वर्षें एकत्र अभ्यास केल्यामुळें व दोघेही प्रेमळ स्वभावाचे असल्यामुळें, ते अगदीं जिवलग मित्र झाले होते. ह्याच विद्यालयांत कामंदकी व सौदामिनी ह्या दोन विद्यार्थिनी अभ्यास करीत होत्या. त्यांचाही स्वभाव अतिशय प्रेमळ असल्यामुळें, त्यांची व ह्या दोन विद्यार्थ्यांची फार मैत्री जमली होती.

वर्षांमागून वर्षें गेलीं. ह्या चौघा विद्यार्थ्यांचा ह्या विद्यालयांतील अभ्यास पुरा झाला. शेवटची परीक्षा होऊन विद्यालय सोडण्याची

वेळ आली. शेवटल्या दिवशीं हीं चौघें एकमेकांचा निरोप घेण्याकरितां एकत्र जमलीं. आतां आपणा सर्वांचा वियोग होणार, हें मनांत येऊन त्यांना फार वाईट वाटलें. पुढील आयुष्यांत काय करावयाचें ह्याबद्दल त्यांचें भाषण झालें. कामंदकी व सौदामिनी ह्या लग्न न करितां, बौद्ध भिक्षुणी होऊन विद्याभ्यासांत व विद्या शिकविण्यांत आपलें आयुष्य घालविणार होत्या. देवरात व भूरिवसु आपापल्या देशांत जाऊन, राजाच्या पदरीं नोकरी धरणार होते. त्यांचे वडील राजाच्या कृपेंतील असल्यामुळें, आपणाला कांहीं काळानें मोठ्या अधिकाराच्या जागा मिळतील अशी त्यांना खात्री होती.

आपला हा स्नेह कायम राहावा अशी ह्या मित्रमैत्रिणींची फार उत्कट इच्छा होती. देवरात म्हणाला, ‘ आपण येथून सुटल्यावर पुन्हा आपल्या गांठीभेटी कधीं होतील कोण जाणे ! माझ्या मनांत एक कल्पना आली आहे, ती मी तुम्हांस सांगतों. मला मुलगा झाला व भूरिवसूला मुलगी झाली किंवा भूरिवसूला मुलगा झाला व मला मुलगी झाली, तर आपल्या मुलांचा विवाह करून हा प्रेमसंबंध कायम ठेवावा. ’ भूरिवसु म्हणाला, ‘ मला ही कल्पना पसंत आहे. मी प्रतिज्ञा करितों कीं मला मुलगी झाल्यास ती मी देवराताच्या पुत्रास देईन किंवा त्याची मुलगी माझ्या मुलाला करीन. ’ कामंदकी म्हणाली, ‘ बंधूंनो, मला हा तुमचा विचार फार आवडला. मी व सौदामिनी ह्या विवाहाला येऊं व तुम्हांला लग्नांत मदत करूं. ह्या मंगल प्रसंगीं आपण चौघेंही एकत्र जमून गत आयुष्याच्या सुखदायक आठवणींच्या गोष्टी सांगत बसूं. ’

ज्या विद्यालयांत त्यांनीं आनंदानें एकमेकांच्या प्रेमळ व सुखदायक सहवासांत बरींच वर्षें घालविलीं होतीं, तें विद्यालय सोडतांना व एकमेकांचा निरोप घेतांना त्यांना फार वाईट वाटलें. विद्यालय सोडल्यावर कामंदकी बुद्धभिक्षुणी झाली व तिनें स्त्रियांना शिकविण्याकरितां पद्मावती नगरीच्या बाहेर एक आश्रम

स्थापन केला व तेथें ती स्त्रियांना विद्या शिकवूं लागली. कामंदकी ही फार विद्वान् होती व कांहीं थोड्या शास्त्रांचा तिनें विशेष अभ्यास केला होता. सौदामिनी ही कामंदकीजवळ हीं शास्त्रें शिकण्याकरितां राहिली. मग ती योगशास्त्राचा अभ्यास करण्याकरितां श्रीपर्वतावर निघून गेली.

देवरात हा आपल्या देशांत परत गेला. तेथील राजाच्या पदरीं त्यानें नोकरी धरली. तो आपल्या शहाणपणानें, हुशारीनें व प्रामाणिकपणानें भराभर वर चढला व त्या देशाचा मुख्य प्रधान झाला. त्याला एक मुलगा झाला. त्याचें नांव त्यानें माधव असें ठेविलें. माधव पांच सहा वर्षांचा झाल्यावर त्याच्या विद्याभ्यासास सुरुवात झाली. तो मूळचाच बुद्धिमान् असल्यामुळें, त्याचा विद्याभ्यास फार चांगला होऊं लागला. वीस वर्षांचा होईपर्यंत माधवानें आपल्या बापाच्या नगरांतच अभ्यास केला. तो अनेक शास्त्रें व कला शिकला. तालीम व युद्धकला ह्यांतही तो फार प्रवीण झाला. ह्यानंतर देवरातानें पुढील विद्याभ्यासाकरितां माधवाला पद्मावतीस धाडलें. उच्च शिक्षणाकरितां त्या वेळीं पद्मावती नगर फार प्रसिद्ध होतें. भरतखंडाच्या अनेक प्रांतांतील विद्यार्थी तेथें शिक्षणाकरितां येत असत.

माधवाच्या बरोबर त्याचा बालमित्र मकरंद हाही पद्मावतीस गेला. मकरंद हा देवराताच्या राजाच्या सेनापतीचा मुलगा होता. माधव व मकरंद ह्यांचा बालपणापासून फार स्नेह होता. पद्मावतीस ते दोघे एकत्र राहूं लागले. माधवाच्या बरोबर त्याच्या कुटुंबांतील विश्वासू तरुण सेवक कलहंस हा आला होता.

आपला मुलगा परदेशीं राहाणार, त्याची तेथें कोणाची ओळख नाहीं, ह्याजबद्दल देवराताला काळजी वाटत होती. त्यानें कामंदकीला माधवावर व मकरंदावर नजर ठेवण्याची व त्यांची काळजी घेण्याची विनंती केली व कामंदकीनें ती गोष्ट मोठ्या आनंदानें

कबूल केली. माधव पद्मावतीस आल्याबरोबर कामंदकीला तिच्या आश्रमांत भेटला. आपल्या मित्राच्या पुत्राला पाहून कामंदकीला फार आनंद झाला. तिनें त्याचें मोठ्या प्रेमानें स्वागत केलें. ह्यानंतर माधव नेहमीं तिला भेटत असे. त्यानें आपल्या गोड स्वभावानें व गुणांनीं कामंदकीचें प्रेम संपादन केलें. मकरंद हाही माधवाच्या बरोबर नेहमीं कामंदकीकडे जात असे. त्याच्या विनयशील, प्रेमळ व गोड स्वभावामुळें कामंदकी माधवाप्रमाणेंच त्याजवर प्रेम करूं लागली. हीं दोन मुलें कामंदकीला दोन तीन दिवस भेटलीं नाहींत, तर तिला चैन पडत नसे. त्यांच्या अभ्यासावर तिची सारखी नजर असे. माधव आपल्या वडिलांच्या ह्या बहिणीला अतिशय मान देई व तिच्या आज्ञेप्रमाणें वागे.

आतां आपण भूरिवसूची हकीकत पाहूं. विद्याभ्यास झाल्यावर भूरिवसु हा पद्मावतीच्या राजाच्या पदरीं राहिला. तो हळुहळू आपल्या बुद्धिमत्तेनें, प्रामाणिकपणानें व शहाणपणानें वर चढत गेला. पद्मावतीच्या राजाचें त्याजवर प्रेम बसलें व त्यानें भूरिवसूला आपला मुख्य प्रधान नेमलें.

भूरिवसूची पत्नीही त्याला अनुरूप अशीच होती. भूरिवसूला प्रथम मुलगी झाली. तिचें नांव त्यानें मालती असें ठेविलें. मालतीच्या जन्मापासून कामंदकी भूरिवसूकडे जास्त वेळां येऊं लागली. तिला त्या मुलीचा फार लळा लागला. भूरिवसूच्या घरीं कामंदकीला फार मान असे. त्याची बायको कामंदकीला थोरल्या नणंदेप्रमाणें मानी. कामंदकी जरी भिक्षुणी झाली होती, तिनें जरी संसाराचा त्याग केला होता, तरी मालतीच्या प्रेमामुळें ती ह्या मायापाशांत सांपडे. मालती चार पांच वर्षांची झाल्यावर ती नोकरांबरोबर आपल्या आत्याच्या आश्रमांत जाई. तिच्या गोड भाषणानें व मधुर लीलांनीं तेथील विद्यार्थिनींना फार आनंद वाटे.

शुक्लपक्षांतील चंद्रकोरीप्रमाणें मालती वाढत चालली. ती जसजशी मोठी होत गेली तसतसें तिचें रूप आणि गुण हींही वाढत

गेलीं. ती अत्यंत सुंदर, निकोप, विनयशील व सद्गुणी होती. ती वडील मंडळींत फारसें बोलत नसे. माधव व मकरंद ज्या वेळीं विद्याभ्यासाकरितां पद्मावतीस आले, त्या वेळीं मालती १७ वर्षांची होती. लेखन, वाचन, चित्रकला, वगैरे कलांचा तिनें चांगलाच अभ्यास केला होता. तिला वाचनाची फार आवड असे.

देवरातानें आपल्या पुत्रासंबंधानें भूरिवसूस कांहींच लिहिलें नव्हतें. ह्याचें कारण कांहीं तरी राजकीयच असलें पाहिजे. त्या दोघा प्रधानांच्या देशांमध्यें विशेषसा स्नेहसंबंध नसावा व ह्यामुळें ह्या दोन प्रधानांना आपला स्नेह उघडपणें दाखवितां येत नसला पाहिजे. भूरिवसूची मुलगी आपल्या माधवाला मिळावी अशी देवराताची उत्कट इच्छा होती आणि माधवाला पद्मावतीला धाडण्याचें हेंही एक कारण होतें. माधवाला पाहिल्यापासूनच आपल्या आवडत्या मालतीला हा योग्य वर आहे अशी कामंदकीची खात्री झाली. तिला भूरिवसु व देवरात ह्यांनीं केलेल्या प्रतिज्ञेची चांगली आठवण होती, तेव्हां मालतीचा विवाह माधवाशीं व्हावा याकरितां तिची खटपटही सुरू झाली.

माधवाशीं बोलतांना कामंदकी आपल्या लाडक्या मालतीचा मधून मधून उल्लेख करीत असे. एकदा माधव भूरिवसूच्या वाड्यावरून जात असतांना, तो मालतीच्या व तिच्या सख्यांच्या दृष्टीस पडला. अर्थातच हा परप्रांतांतील तरुण कोण असावा ह्याजबद्दल त्यांच्या मनांत कुतूहल निर्माण झालें. ह्या वेळीं कामंदकीही भूरिवसूच्या येथेंच होती. तिनें हा तरुण कोण आहे, तो किती कुलशीलवान आहे, तो किती सद्गुणी आहे, त्याच्या वडिलांनीं त्याला कशाकरितां येथें धाडिलें आहे ह्याची सर्व हकीकत मालतीला व तिच्या सख्यांना सांगितली.

कामंदकीची अवलोकिता म्हणून एक शिष्या होती. ती मालतीच्या येथें नेहमीं जात असे. मालतीला ती माधवाची माहिती देत असे.

त्याच्या गुणांची ती नेहमीं स्तुति करीत असे. एके दिवशीं कामंदकीनें तिला प्रश्न केला, 'वत्से अवलोकिते, देवरात आणि भूरिवसु ह्यांच्या मुलांचा मंगल विवाह लवकरच होईल ना? आणि आपली इच्छा सफल होईल ना?' अवलोकिता म्हणाली, 'भगवति, आपण वैराग्य धारण केलें आहे, भगवीं वस्त्रें आपण धारण करीत आहां, स्वसुखाकडे आपलें बिलकुल लक्ष नाहीं. असें असतांना मालती-माधवाच्या विवाहाची आपणांस एकसारखी चिंता लागून राहिली आहे हें मोठें आश्चर्य आहे.'

ह्यावर कामंदकीनें तिला पूर्वीची सर्व हकीकत सांगितली. त्यावर अवलोकिता म्हणाली, 'असें जर आहे, तर अमात्य भूरिवसु आपली मालती माधवाला कां देत नाहीं? अमात्य भूरिवसु तर मालतीच्या लग्नाबद्दल अक्षर देखील बोलत नाहीं, असें कां बरें?'

कामंदकी म्हणाली, 'ह्या लग्नाला विघ्न उत्पन्न झालें आहे, म्हणून अमात्य ह्या गोष्टीसंबंधानें कांहीं बोलत नाहीं.'

पद्मावतीच्या राजाचा नंदन नांवाचा एक आवडता सरदार होता. तो वयानें चाळिशीच्या जवळ आला होता, तथापि त्याला लग्न करण्याची फार इच्छा होती. मालती त्याला फार आवडली. त्यानें राजाला विनंती केली, कीं आपण भूरिवसूला सांगा व त्याची मुलगी मला देववा. राजानें भूरिवसूजवळ ही गोष्ट काढली. तेव्हां भूरिवसूनें 'महाराजांची आपल्या मुलीवर सर्वस्वी सत्ता आहे,' असें मोघम बोलून वेळ मारून नेली. मालतीचें लग्न माधवाशीं व्हावें अशीच त्याची मनापासून इच्छा होती. पण ह्या लग्नांत आपला हात आहे असें राजाला वाटूं नये, म्हणून तो जपत होता. भूरिवसूनें ही सगळी कामगिरी कामंदकीवर सोंपविली होती व तिनें ती मोठ्या आनंदानें आपल्या अंगावर घेतली होती. ही सगळी हकीकत कामंदकीनें अवलोकितेला सांगितली.

★

२५६०० ज्ञा. वा. १९५१ ३-०



## बागेंतील भेट

त्या आठवड्यांत पद्मावतीच्या बाहेरील बागेंत शंकराचा मोठा उत्सव होता. हा उत्सव पाहण्यास गांवांतील लोकांची गर्दी होत असे. अवलोकितेच्या सांगण्यावरून मालती हा उत्सव पाहण्याकरितां आपल्या थोड्या दासी व दास घेऊन जाणार होती. माधवालाही अवलोकितेनें हा उत्सव पाहण्याचा आग्रह केला व 'दुपारच्या वेळीं तेथें फारशी गर्दी नसते, म्हणून त्याच वेळीं तुम्ही तेथें जा,' असें तिनें माधवास सांगितलें. त्याप्रमाणें दुपारीं माधव त्या बागेंत गेला. तो उत्सव पाहून त्या बागेंतील दूर असणाऱ्या एका बकुलीच्या झाडाखालीं तो बसला. तेथील फुलें गोळा करून त्यानें एक सुंदर हार गुंफण्यास प्रारंभ केला व तो त्या कामांत अगदीं गढून गेला. हार करण्यांत माधव फार हुशार होता. थोड्या वेळानें मालतीच्या दोन सख्या व मालती तेथें आली. तिच्या सख्यांनीं माधवाकडे बोट दाखवून 'तोच हा' असें मालतीस सुचविलें. त्यांपैकीं एक सखी म्हणाली, 'ताईसाहेब, आज मोठा भाग्याचा दिवस आहे. तें पाहा पलीकडे कोणाचें तरी कोणी बसलें आहे!' माधवाला जरी हें सगळें ऐकूं येत होतें, तरी जणूं काय तें आपणांला ऐकूंच येत नाहीं अशा रीतीनें तो बकुलपुष्पांची माला गुंफीत होता. मालतीची दृष्टि माधवाकडे गेली व त्याच वेळीं माधवानेंही वर मान करून तिजकडे पाहिलें. लवकरच मालती आपल्या हत्तीवर बसून नगरांत परत गेली.

ह्यानंतर थोड्याच वेळानें मालतीची सखी लवंगिका त्या बागेंत आली. ती माधवाला नमस्कार करून म्हणाली, 'महाभागा, आमच्या ताईसाहेबांना तुमची ही बकुलमाला फार आवडली आहे. आपलें कौशल्य पाहून ताईसाहेबांना आनंद झाला आहे. जर आपण ही

माला आमच्या सखीला कंठांत धारण करण्यास द्याल, तर तिला फार धन्यता वाटेल.' माधवानें तिचें नांव विचारलें, तेव्हां



मालतीची दृष्टि माधवाकडे गेली व त्याच वेळीं माधवानेंही वर मान करून तिजकडे पाहिलें.

'अमात्य भूरिवसूची मुलगी मालती हिची मी जिवलग सखी आहें व माझें नांव लवंगिका आहे,' असें तिनें त्यास सांगितलें. माधवानें ती माला मोठ्या आनंदानें तिला दिली.

मालतीला पाहून माधवाच्या मनांत प्रथम भेटीलाच प्रेम उत्पन्न झालें. ह्यापूर्वीं कामंदकीनें अनेक वेळां मालतीच्या गुणांचें वर्णन केल्यामुळें, तिजबद्दल माधवाच्या मनांत फार अनुकूल ग्रह झाला होता आणि तिचें प्रत्यक्ष दर्शन झाल्यानें, त्याच्या मनांत प्रेमाचा उद्भव झाला. मालती निघून गेल्यावर शून्य मनानें तो विचार करीत बसला असतांना मकरंद तेथें आला.

आपल्या मित्राला चिंताक्रांत बसलेला पाहून मकरंदाला फार आश्चर्य वाटलें. माधवानें त्याला झालेली सर्व हकीकत सांगितली. कामंदकी आत्या जिच्यावर इतकें प्रेम करिते व जिची इतकी स्तुति करिते, त्याच मालतीवर माधवाचें प्रेम बसलेलें पाहून त्याला समाधान वाटलें. पण भूरिवसु प्रधान आपली मुलगी नंदनाला देणार आहे, ही बातमी मकरंदानें नुकतीच ऐकिली होती, म्हणून त्याला आपल्या मित्राला मालती मिळेल अशी खात्री वाटेना व त्याला माधवाबद्दल काळजी वाटूं लागली.

ते दोघे मित्र बोलत आहेत, इतक्यांत माधवाचा नोकर कलहंस हा तेथें एक चित्र घेऊन आला. ते दोघे बोलत आहेत असें पाहून तो झाडाच्या आड जरा थांबला. पण त्यांचें बोलणें मालतीविषयींच चाललें आहे असें पाहून तो पुढें झाला व त्यानें तें चित्र त्या दोघांना दाखविलें. तें चित्र माधवाचेंच होतें. तें पाहून त्या दोघांना फार आश्चर्य वाटलें व 'हें चित्र तूं कोठून आणलेंस?' म्हणून त्यांनीं कलहंसाला विचारलें. त्यानें सांगितलें, कीं हें चित्र भूरिवसूची मंदारिका नामें दासी आहे, तिजजवळ होतें व तिनें मालतीची सखी लवंगिका हिच्याजवळून पाहण्याकरितां मागून घेतलें होतें. तें चित्र मालतीनें स्वतः आपलें मनोरंजन करण्याकरितां काढलें होतें. माधवानें त्या चित्राच्या मागील बाजूस कलहंसाच्या जवळ असलेल्या रंगांनीं मालतीचें सुंदर चित्र काढलें.

इतक्यांत मंदारिका कलहंसाजवळ आपलें चित्र मागण्याकरितां आली. कलहंसानें आपण आणलेलें चित्र इकडे पळवून आणलें व तें

माधवाला दाखविलें हें तिला आवडलें नाहीं. मालती व लवंगिका आपल्याला रागावतील अशी तिला भीति पडली. कलहंसानें तिचें चित्र तिला परत दिलें. पाठीवरील मालतीचें चित्र पाहून तिला आश्चर्य वाटलें, ' हें चित्र कोणीं काढलें ? ' असें तिनें कलहंसाला विचारलें. ' माझ्या धन्यानें, ' असें त्यानें उत्तर दिलें. त्यावर त्याला ती म्हणाली, ' तुझ्या धन्यानें ताईसाहेबांचें चित्र कां काढलें ? ' कलहंस म्हणाला, ' ज्या कारणानें तुझ्या ताईसाहेबांनीं माझ्या मालकाचें चित्र काढलें, त्याच कारणानें माझ्या मालकानें तुझ्या ताईसाहेबांचें चित्र काढलें, समजलीस ?' हें ऐकतांच मंदारिका हसली व तें चित्र घेऊन निघून गेली. तिनें तें चित्र लवंगिकेला दाखविलें व तिनें तें मालतीला दाखविलें. माधवानें आपली आकृति इतक्या कौशल्यानें काढलेली पाहून मालतीला अत्यंत आनंद झाला.

★

— ३ —

# शिवालयांतील भेट

दुसऱ्या दिवशीं कामंदकी भूरिवसूच्या घरीं गेली. मालतीनें तिला नमस्कार केला. ' तुझे मनोरथ पूर्ण होवोत ! ' असा कामंदकीनें तिला आशीर्वाद दिला. ' भगवतीची प्रकृति ठीक आहे ना ? ' असा मालतीनें कामंदकीला प्रश्न विचारला. कामंदकी दीर्घ उच्छ्वास टाकून म्हणाली, ' वत्से, आमच्यासारख्यांनीं ह्या मायेच्या पसाऱ्यांत पडूं नये. परंतु तुम्हां मुलांच्या मायेमुळे आम्ही सुखदुःखाच्या भोंवऱ्यांत सांपडतों. सध्यांच पाहा ! नगरांत जी बातमी पसरली आहे, तिच्या योगानें माझ्या मनांत चिंता उत्पन्न झाली आहे. '

लवंगिकेनें विचारलें, 'भगवती, आपण कोणती बातमी ऐकिली आहे?' कामंदकी म्हणाली, 'साऱ्या नगरांत पसरलेली बातमी तुम्हांस अद्याप कशी कळली नाहीं? नगरांत अशी बातमी पसरली आहे, कीं अमात्य भूरिवसु आपली मुलगी राजाचा आवडता सरदार नंदन ह्याला देणार आहे. नंदनासारख्या म्हाताऱ्याला व राजाच्या खुषमस्कऱ्याला अमात्य आपली मालती देणार हें ऐकून माझ्या मनाला फार दुःख झालें आहे!'

लवंगिकेनें विचारलें, 'भगवती, तात भूरिवसु म्हाताऱ्या खुषमस्कऱ्याला आपली मुलगी कां देत आहेत?' कामंदकी म्हणाली, 'ह्या मुत्सद्दी लोकांची कृति कळण्यास फार कठीण असते. मालती राजाच्या खुषमस्कऱ्याला देऊन राजाची मर्जी संपादन करावी अशी प्रधानाची इच्छा असली पाहिजे.'

आपल्याला म्हाताऱ्या नंदनाला देणार हें ऐकून मालतीच्या मनाला मोठा धक्का बसला. लवंगिका म्हणाली, 'भगवती, ह्या संकटांतून सुटण्याला कांहीं मार्ग नाहीं काय?' कामंदकी म्हणाली, 'जेथें प्रत्यक्ष बाप आपली मुलगी नंदनासारख्या वृद्धाला व खुषमस्कऱ्याला देत आहे, तेथें दुसरीं माणसें काय करणार?'

लवंगिका म्हणाली, 'भगवती, तात भूरिवसु असें कां करितात? आपल्या एकुलत्या एका मुलीच्या सुखाची त्यांना कांहींच पर्वा नाहीं का?' कामंदकी म्हणाली, 'वत्से, ह्या राजकारस्थानी पुरुषांना राजकारणाच्या पुढें मुलें बाळें ह्यांची कांहींच पर्वा नसते. आतां ह्या लग्नाच्या बाबतींत खरें म्हटलें तर मुलींना देखील स्वातंत्र्य आहे. पूर्वकालचा इतिहास पाहिला, तर शकुंतलेनें आपल्या इच्छेनें दुष्यंतास गांधर्वविवाहानें वरिलें. देवयानीनें ययातीस, वासवदत्तेनें उदयनास वरिलें. वडिलांस न विचारतां मुलींनीं आपल्या आवडत्या वरास स्वतःच्याच इच्छेनें वरिल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. पण जाऊं दे! मालतीचें व नंदनाचें लग्न होऊन भूरिवसूचें राजकारण सफल होऊं दे!'

भूरिवसूची इच्छा अशी होती, कीं मालतीनें स्वतःच गांधर्व-विवाहानें माधवास वरावें, म्हणजे आपल्यावर कांहीं जबाबदारी येणार नाहीं. 'मी काय करूं? मुलीनें मला न कळवितां हा विवाह केला; अलीकडच्या मुली अशाच आडदांड व बेपर्वा झाल्या आहेत.' असें म्हणून त्याला राजाची समजूत करितां आली असती. मालतीनें बापाला न विचारतां माधवाला वरण्यास तयार व्हावें, ह्याच हेतूनें कामंदकी व लवंगिका ह्यांनीं भूरिवसूची निंदा चालविली होती.

त्यांचें हें भाषण चाललें आहे, इतक्यांत कामंदकीची बुद्धिरक्षिता नांवाची शिष्या आली व तिनें 'माधव आजारी आहे, आपणांस त्यानें बोलाविलें आहे' असें सांगितलें. लवंगिकेनें आपणास माधवाची कांहींच माहिती नाहीं असें दाखविलें व 'ज्यावर आपण इतकें प्रेम करितां, तो हा माधव कोण आहे?' असें कामंदकीस विचारलें. कामंदकीनें माधवाच्या कुलाची, रूपाची, गुणांची व शौर्याची पुष्कळच स्तुति केली. नंतर मालतीचा निरोप घेऊन ती आश्रमास परत गेली.

मालती ही फार विनयशील मुलगी होती. वडिलांच्या इच्छेविरुद्ध ती कोणतीही गोष्ट करण्यास तयार झाली नसती. तिचें मन तयार करण्याकरितांच कामंदकीचा हा यत्न चालला होता. वास्तविक पाहातां नंदन म्हातारा नव्हता. तो सुमारें ४० वर्षांचा होता व तो फार श्रीमंत होता. परंतु कामंदकीनें त्याचें शक्य तितकें वाईट चित्र मालतीच्या समोर काढलें.

नंदनाशीं लग्न करून वडील मंडळी आपल्या आयुष्याची राखरांगोळी करीत आहेत, अशी मालतीची दृढ समजूत होऊन ती फार खिन्न झाली.

ह्यानंतर त्या महिन्यांतील कृष्ण चतुर्दशी आली. पद्मावती नगरीच्या बाहेर, पण नगरीच्या जवळच बागेंत शंकराचें एक देवालय होतें. तेथें कृष्ण चतुर्दशीला नगरींतील शंकराची भक्त

मंडळी देवाच्या दर्शनास जात असत. मालती व तिची आई वद्य चतुर्दशीला नित्यनेमानें या देवाचें दर्शन घेत असत. त्या दिवशीं कामंदकीच्या सांगण्यावरून माधवही त्या देवाच्या दर्शनास संध्याकाळीं गेला होता व बागेंतील अशोकाच्या झाडाजवळ बसला होता. मालती आईसह देवालयांत आली. कामंदकीनें तिला सांगितलें, 'वत्से, बागेंतून स्वतः फुलें आण व भगवान् शंकराची पूजा कर, म्हणजे तो तुझें मंगल करील.'

मालती शिवालयाच्या बागेंतील एका मंडपांतील जाईचीं व जुईचीं फुलें तोडूं लागली. मधून मधून पडलेलीं फुलेंही ती गोळा करीत होती. बरींच फुलें तिनें गोळा केली. इतक्यांत कामंदकी तेथें आली. मालतीला पाहून कामंदकी म्हणाली, 'वत्से मालती, तूं बरींच फुलें गोळा केलीं आहेस. फुलें तोडून तूं दमली आहेस. इकडे या शिलातलावर आपण जरा बसूं व नंतर शिवालयांत जाऊं.' मग त्या दोघीही त्या मांडवांतील एका शिळेवर बसल्या.

कामंदकी म्हणाली, 'तुम्हांला माहीतच आहे, कीं माझ्या देवरात बंधूचा माधव नांवाचा मुलगा येथें मजजवळ येऊन राहिला आहे. मागें तो येथील वसंतोत्सवास गेला होता. तेथें त्यानें एक रूपवती व गुणवती मुलगी पाहिली. या मुलीवर त्याचें फार प्रेम बसलें. तेव्हांपासून तो फार अस्वस्थ झाला आहे. धड बोलतही नाहीं. ह्यामुळें मला त्याची फार काळजी वाटूं लागली आहे.'

लवंगिका म्हणाली, 'भगवती, आपली मालतीताईही त्याच उत्सवास गेली होती. तिनें तेथील बागेंत एक गुणवान, रूपवान व कुलशीलवान तरुण पाहिला. त्याला पाहिल्यापासून आमच्या ताईचीही माधवासारखीच स्थिति झाली आहे.'

कामंदकी म्हणाली, 'माधवानें मालतीलाच पाहिलें व मालतीवरच त्याचें प्रेम जडलें आहे, असें मला कळलें आहे.'

आपणावर माधवाचें प्रेम जडलें आहे हें ऐकून मालतीला आनंद झाला; पण आपल्या प्रेमामुळें त्याची झालेली अवस्था ऐकून त्या कोमल अंतःकरणाच्या मुलीला वाईट वाटलें.

कामंद्कीचें आणि मालतीचें व लवंगिकेचें चाललेलें भाषण माधव पलीकडे ऐकत होता. हें भाषण आणखीही चाललें असतें, पण इतक्यांत एक विघ्न उपस्थित झालें.

या देवालयाच्या अंगणांत एका बाजूला दोन चार वाघ व दुसरीं कांहीं हिंस्र जनावरें पिंजऱ्यांत ठेवलेलीं होतीं. त्या पिंजऱ्यांपैकीं एका पिंजऱ्याचें दार वाघानें उघडलें व तो वाघ एकदम बाहेर पडला. त्यानें एक दोन माणसांना जखमीही केलें. 'वाघ सुटला, सांभाळा! वाघ सुटला, सांभाळा!' अशी जिकडे तिकडे ओरडा-ओरड झाली. इतक्यांत कामंद्कीची बुद्धिरक्षिता नांवाची शिष्या घाबऱ्या घाबऱ्या धावत कामंद्कीकडे आली. ती कामंद्कीला म्हणाली, 'भगवती, घात झाला. मद्यंतिका आपल्या गड्याला घेऊन शिवदर्शनाला येत होती. इतक्यांत वाघ त्याच बाजूला आला. मद्यंतिकेच्या बरोबरचा गडी वाघाला पाहून पळून गेला. आतां गरीब बिचाऱ्या मद्यंतिकेवर वाघ हल्ला करील!'

हे शब्द तिच्या तोंडांतून बाहेर पडतात तोंच माधव त्या लताकुंजांत आला व बुद्धिरक्षितेला म्हणाला, 'मद्यंतिका कोणत्या बाजूला आहे तें मला झटकन् सांगा; मी मद्यंतिकेच्या रक्षणास जातों.' बुद्धिरक्षितेनें त्याला सांगितलें, 'बागेच्या बाहेर देवळाच्या समोर असलेल्या रस्त्यावर.' लागलीच माधव तिकडे निघाला.

मकरंद नगरांत गेला होता. तेथें त्यानें बातमी ऐकिली, कीं 'नंदनाचें व मालतीचें लग्न ठरलें आणि त्या विवाहाचा साखरपुडा संध्याकाळीं व्हावयाचा आहे.' आपल्या मित्राला जर ही बातमी एकदम कळली, तर त्याच्या मनाला धक्का बसेल, म्हणून आपणच ही बातमी त्याला सांगावी, या हेतूनें मकरंद घरीं गेला. तेथें त्याला कळलें, कीं माधव शिवालयांत गेला आहे. तेव्हां तो तिकडे निघाला.

तो देवळाजवळ आला, तों वाघ मदयंतिकेवर झडप घालीत आहे, असें त्यास दिसलें. त्याबरोबर तो तिकडे धावत गेला व त्यानें वाघाला तरवारीचा वार केला. वाघाला तो वार जबर लागला, पण मरतां मरतां वाघानें मकरंदाच्या दंडावर पंजा मारला. मकरंदानें आणखी एका वारानें वाघाला ठार केलें, पण जखमेंतून रक्तस्राव होऊं लागल्यामुळें त्याला घेरी आली व तो खालीं दगडावर पडणार, तोंच मदयंतिकेनें त्याचें शरीर सावरून धरलें. तिनें त्याचें डोकें आपल्या मांडीवर घेतलें व ती त्याला वारा घालूं लागली.

इतक्यांत माधव तेथें आला. मकरंद मूर्च्छित पडलेला होता. त्याच्या दंडांतून रक्त वहात होतें. जवळच वाघ मरून पडलेला होता व तेथें रक्ताचें थारोळें झालें होतें. तें पाहून माधवाला वाटलें, कीं आपल्या मित्राला जबर जखम लागून तो जखमी झाला आहे. माधवाचें डोकें फिरूं लागलें व तो तेथेंच मूर्च्छा येऊन पडला. इतक्यांत मालती, कामंदकी व बुद्धिरक्षिता तेथें आल्या. कामंदकीनें मकरंदाची जखम धुऊन पट्टी बांधली व रक्तप्रवाह थांबविला. मदयंतिकेनें त्याला पाणी पाजून त्याच्या तोंडावर पाणी शिंपडलें व ती आपल्या पदरानें त्याला वारा घालूं लागली. कामंदकीनें माधवाच्या तोंडावर गार पाणी शिंपडलें व मालतीला त्याला वारा घालण्यास सांगितलें.

मकरंद प्रथम सावध झाला. तो उठून बसला, हें पाहून मालतीनें माधवाच्या कपाळावर हात ठेविला व ती त्याला हळूच म्हणाली, 'महाभागा, सावध व्हा. आपले स्नेही सावध झाले आहेत.'

मकरंदानें माधवाची ती स्थिति पाहिली. तो म्हणाला, 'प्रिय मित्रा, सावध हो. अरे, हा पाहा मी तुजजवळ बसलों आहें, मी अगदीं खुशाल आहें.' माधव सावध झाला. त्यानें आपल्या प्रियमित्राच्या गळयास मिठी मारली. ते दोघे सावध झालेले पाहून सर्वांना अतिशय आनंद झाला.

कामंदकी विनोदानें माधवाला म्हणाली, 'वत्सा माधवा, मालतीनें तुझ्या मित्राच्या कुशलतेची आनंदाची वार्ता प्रथम तुला सांगितली, तेव्हां या आनंदाच्या प्रसंगीं तूं तिला कांहींतरी बक्षीस दिलें पाहिजे.

माधव म्हणाला, 'माझ्या मित्राच्या कुशलतेची वार्ता सांगून जिनें मला सावध केलें, तिला मी आपलें हृदय व जीव अर्पण करीत आहें!'



'जिनें मला सावध केलें, तिला मी आपलें हृदय अर्पण करीत आहें.'

लवंगिका म्हणाली, 'हा आमच्या ताईसाहेबांवर आपला कृपाप्रसाद्च आहे!'

मद्यंतिकेला बुद्धिरक्षितेनें 'हाच तो माधव' असें हळूच सांगितलें. माधवाच्या कुशल भाषणाचें मद्यंतिकेला फार कौतुक वाटलें.

कामंदकी मकरंदाला म्हणाली, ‘ वत्सा मकरंदा, तूं इकडे ऐन वेळीं या मदयंतिकेला वांचविण्यास कसा आलास ? ’

मकरंद म्हणाला, ‘ मी नगरांत एक अनिष्ट बातमी ऐकली. ती माधवाला सांगावी म्हणून त्वरेनें घरीं आलों. परंतु माधव शिवालयांत गेला आहे असें मला कळलें, म्हणून मी त्वरेनें इकडे आलों. ’

इतक्यांत मदयंतिकेच्या घरून एक गडी आला व तो तिला म्हणाला, ‘ ताईसाहेब, लवकर घरीं चला. आपणांस आईसाहेबांनीं बोलाविलें आहे. आपले पद्मावतीचे महाराज आपल्या घरीं दुपारीं येऊन गेले व अमात्य भूरिवसूची कन्यका तुमच्या बंधूला देण्याचें महाराजांनीं ठरविलें. आतां संध्याकाळीं साखरपुड्याचा समारंभ व्हावयाचा आहे, तरी घरीं लवकर चलावें. ’

मालती व मदयंतिका या एकाच शाळेंत शिकल्या होत्या. त्या एकमेकींच्या मैत्रिणी होत्या. मालती आपली भावजय होणार म्हणून मदयंतिकेला फार आनंद झाला. ती म्हणाली, ‘ सखे मालती, तूं आतां माझी वहिनी होणार व आमच्या घरची मालकीण होणार, म्हणून मला किती आनंद झाला आहे ! ’

मालती व माधव या दोघांनाही या बातमीनें अतिशय वाईट वाटलें होतें. पण तें त्यांनीं उघडपणें दाखविलें नाहीं. बिचारी मालती काय बोलणार ! पण लवंगिकेनें उत्तर दिलें, ‘ सखे मदयंतिके, तुम्हांला जसा आनंद झाला आहे तसाच आम्हांलाही आनंद झाला आहे. ’

‘ बुद्धिरक्षिते, चल, आपण जाऊं ’ असें म्हणून मदयंतिका जाण्यास निघाली. ज्यानें स्वतःचा प्राण संकटांत घालून आपणाला वांचविलें त्या उपकर्त्या मकरंदाकडे तिनें आदरपूर्वक व प्रेमानें पाहिलें. ती बुद्धिरक्षितेला म्हणाली, ‘ सखे, या महाभागाची व माझी पुन्हा गांठ पडेल काय ? ’ बुद्धिरक्षिता म्हणाली, ‘ जर भाग्य असेल तर खात्रीनें पडेल ! ’

२९५०

माधव व मालती हीं या वार्तेनें फार खिन्न झालीं होतीं. कामंदकी माधवाला म्हणाली, ‘ वत्सा, भूरिवसु स्वतः तुला बोलावून मालती देईल अशी का तुझी कल्पना होती ? ’ माधव म्हणाला, ‘ नाहीं नाहीं. ’ कामंदकी म्हणाली, ‘ मग या वार्तेनें तुला पूर्वीपेक्षां आपली वाईट स्थिति झाली असें वाटतें काय ? ’ मकरंद म्हणाला, ‘ आतां मालतीला नंदनाला द्यावयाचें ठरलें, म्हणून वाईट वाटतें. ’ कामंदकी म्हणाली, ‘ मला तें सर्व माहीत आहे. राजानें अमात्याला ‘ तुम्ही आपली मालती नंदनाला द्यावी असें मला वाटतें, ’ असें म्हटलें. यावर अमात्यानें उत्तर दिलें, ‘ महाराजांची आपल्या कन्येवर सर्वस्वी मालकी आहे. ’ याचा अर्थ राजाची मालकी स्वतःच्या कन्येवर आहे, दुसऱ्याच्या कन्येवर नाहीं, असा होतो. राजानें भूरिवसूची मालती नंदनाला देऊं केली तर त्या गोष्टीनें अमात्य कांहीं बांधला गेला नाहीं. ’ मकरंद म्हणाला, ‘ हीही गोष्ट खरीच आहे. ’ कामंदकी म्हणाली, ‘ मग आपण या कार्यांत निराश होतां कामा नये. माझा प्राण गेला तरी हरकत नाहीं, पण माधवाचा व मालतीचा विवाह मी घडवून आणीनच. ’

मकरंद म्हणाला, ‘ भगवती, आमच्यावर तुमचें केवढें हें प्रेम ! वास्तविक पाहतां तुम्हीं संन्यास घेतला आहे. तुम्ही विद्यादान व धर्माचरण यांतच सर्व आयुष्य घालवीत आहां. तथापि आमच्या-करितां तुम्ही एवढे प्रयत्न करीत आहां. आणखी काय पाहिजे ? इतकेंही करून जर या कार्यांत यश न आलें तर आमचें दुर्दैव ! ’

यांचें हें भाषण चाललें आहे, इतक्यांत भूरिवसूचा एक सेवक आला. त्यानें सांगितलें, कीं ‘ आईसाहेब म्हणतात, कीं भगवतींनीं मालतीताईला घेऊन लवकर घरीं यावें. ’ यावर कामंदकी म्हणाली, ‘ वत्से, चल आपण घरीं जाऊं. ’

मालती फार खिन्न झाली होती. ती लवंगिकेला हळूच म्हणाली, ‘ सखे, आतां या महाभागाचें पुन्हा मला दर्शन कसचें होणार ! ही मालती खरोखरच दुर्दैवी आहे ! बाबांच्या निष्ठुर अशा महत्त्वाकांक्षेला

मी बळी पडत आहें. आतां मी काय करूं? कोणाला शरण जाऊं?' माधवाचेंही मन फार खिन्न झालें. आतां पुन्हा मालती आपल्या दृष्टीस पडणार नाहीं असें त्याला वाटलें.

कामंदकी, मालती व लवंगिका ह्या तेथून गेल्या. माधव व मकरंद हे दोघेच तेथें राहिले. आतां नंदन व मदयंतिका ह्या दोघांची थोडी माहिती सांगून नंतर पुन्हा मूळ कथेकडे वळूं. नंदन हा पद्मावतीच्या पिढीजाद घराण्यांतील एक सरदार होता. त्याचें वय ह्या वेळीं चाळिशीच्या जवळ आलें होतें. तो फार श्रीमान् होता. शौर्यापेक्षां खुशामत हा गुण त्याच्याजवळ विशेष होता. ह्यामुळें पद्मावतीच्या राजाची त्याजवर फार कृपा होती. त्याची पहिली बायको ह्या वेळीं स्वर्गस्थ झालेली होती. अमात्याची मालती व नंदनाची बहीण मदयंतिका ह्या एकाच वयाच्या होत्या. त्या दोघीही बाळपणापासून मैत्रिणी होत्या. एकाच गुरूच्या हाताखालीं त्यांचें शिक्षण झालें होतें. मालती व मदयंतिका ह्या नेहमीं एकमेकींच्या घरीं जात असत. नंदनानें मालतीला पुष्कळ वेळां पाहिलेलें होतें; तेव्हां तिच्याशीं लग्न लावावें अशी त्याला इच्छा उत्पन्न झाली. अमात्य भूरिवसूजवळ आपण मुलीची मागणी केली, तर तो आपली मागणी कबूल करणार नाहीं, अशी नंदनाची खात्री होती. आणि म्हणूनच त्यानें राजाजवळ ही गोष्ट काढली. राजानें भूरिवसूला आपली मुलगी नंदनास देण्यास सांगितलें. भूरिवसूला राजाचें म्हणणें उघडपणें नाकारतां येईना, म्हणून त्यानें 'महाराजांची आपल्या मुलीवर सर्व प्रकारें सत्ता आहे,' असें मोघम उत्तर दिलें. राजाला वाटलें, कीं भूरिवसूनें आपलें म्हणणें कबूल केलें. राजानें नंदनाला लग्नाची तयारी करण्यास सांगितलें. भूरिवसूच्या संमतीनें त्यानें लग्नाचा मुहूर्तही ठरवून टाकला.

मालतीची सखी मदयंतिका ही कामंदकीच्या चांगल्या परिचयाची असे. मालतीबरोबर ती नेहमीं कामंदकीच्या आश्रमांत जात असे. मदयंतिका ही मालतीपेक्षां जास्त बोलकी व धीट असे.

कामंदकीचेंही नंदनाच्या घरीं मधून मधून जाणें येणें असे. ह्या सर्व कारणांमुळें कामंदकीचें मदयंतिकेवरही प्रेम होतें. मदयंतिकेला मकरंद हा योग्य वर आहे असें कामंदकीला वाटलें व मकरंदाला ही योग्य पत्नी होईल अशी तिची खात्री झाली. शिवाय नंदनाचा व अमात्य भूरिवसूचा स्नेह कायम राहावा, त्यांच्यांत वैनमस्य येऊं नये अशी तिची इच्छा होती. मदयंतिकेचें लग्न मकरंदाशीं झालें, तर भूरिवसूचा व नंदनाचा स्नेह कायम राहील असें तिला वाटलें. आपल्या मुलांच्या कल्याणाकरितां व राजकारणाकरितां मदयंतिकेचें लग्न मकरंदाशीं लावण्याचा तिनें निश्चय केला. बुद्धिरक्षिता नांवाची कामंदकीची शिष्या मदयंतिकेची मैत्रीण होती. तिनें मकरंदाची स्तुति मदयंतिकेजवळ करण्यास प्रारंभ केला. कामंदकीनें बोलतां बोलतां मकरंदाजवळ मदयंतिकेच्या गुणांचें व स्वरूपाचें पुष्कळ वर्णन केलेंच होतें. मकरंदानें आपल्या स्वतःच्या जिवावर उदार होऊन वाघाच्या जवड्यांतून मदयंतिकेला सोडविलें, तेव्हां-पासून तर तिनें आपलें सर्व प्रेम त्याला अर्पण केलें. मकरंदालाही तिचें रूप व तिचे गुण ह्या योगानें ती फार प्रिय झाली. तिनें त्याचें डोकें आपल्या मांडीवर घेऊन त्याला वारा घालून सावध केलें, त्याच वेळीं मकरंदाचें मनही मदयंतिकेनें हिरावून घेतलें. आतां आपण आपल्या कथेकडे वळूं.

मकरंदाकडे पाहून माधव म्हणाला, ' सख्या मकरंदा, मदयंतिकेचें तुजवर फार प्रेम दिसतें. आणि मला खात्री आहे, कीं बुद्धिरक्षितेच्या साहाय्यानें हा विवाह घडून येईल.' ह्यानंतर ते दोघे स्नेही पद्मावतीजवळ वरदा आणि सिंधु ह्या नद्यांचा संगम झाला होता तेथें संध्याकाळची शोभा पाहण्याकरितां व मनाला रिझविण्या-करितां गेले. थोडा वेळ थांबून ते शहरांत गेले. मकरंदाची जखम फारशी मोठी नव्हती.

★

# मालतीची संकटांतून सुटका

पूर्वकाळीं आपल्या ह्या देशांत कापालिक नांवाचा एक धर्मपंथ होता. ह्या लोकांची संख्या फार थोडी होती आणि ह्या पंथाबद्दल लोकांच्या मनांत भीति व तिरस्कार होता. ह्या पंथाचे लोक मनुष्याच्या कपालांच्या माळा गळ्यांत घालीत. कपालांतूनच ते लोक जेवत किंवा पाणी पीत. हे लोक शंकराची व देवीची पूजाअर्चा करीत. त्यांचीं देवळें बहुधा स्मशानाच्या जवळ असत. त्यांचे पूजेचे मार्गही भयंकर असत. ते मनुष्याच्या आंतड्यांचीं जानवीं गळ्यांत घालीत. मनुष्याची किंवा पशूची चरबी व मांस ह्यांचा देवाला नैवेद्य दाखवीत. तरुण कुमाराचा किंवा कुमारीचा आपल्या देवीला बळी दिला असतां देवी आपल्यावर प्रसन्न होईल व आपल्याला मोठी सिद्धि प्राप्त होईल अशी त्यांची समजूत असे. आकाशांतून उडणें, लांब अंतरावरचे देखावे पाहतां येणें, पृथ्वीच्या पोटांत असलेलें किंवा पुरलेलें द्रव्य दिसणें, इत्यादि सामर्थ्य अंगीं येणें ह्याला ते सिद्धि म्हणत. सामान्य लोक ह्या कापालिकांना फार भीत. ते जवळपास आले, कीं गांवांत खळबळ उडे व गांवांतील मुलांचा बळी पडतो कीं काय ह्याची लोकांना भीति वाटे. ह्या लोकांना मंत्रविद्या येते अशी लोकांची समजूत असे व ह्यामुळें लोकांना ह्या कापालिकांची फारच भीति वाटे. कापालिक पंथांत स्त्रियाही असत.

पद्मावती नगरीच्या दक्षिणेस नदीच्या तीराजवळ शहरचें स्मशान होतें. ह्या स्मशानांत देवीचें एक जुनें देऊळ होतें. कापालिकांची ही मोठी आवडती देवी होती. पद्मावतीच्या ह्या

देवालयांत अघोरघंट नांवाचा एक कापालिक ह्या वेळीं येऊन राहिला होता. लवकरच नगरांत ती बातमी पसरली.

मदयंतिकेला नंदनानें वाघाच्या जबड्यांतून ज्या दिवशीं सोडविलें व ज्या दिवशीं माधव व मालती ह्यांची शिवालयांत गांठ पडली तो दिवस वद्य चतुर्दशीचा होता. माधव व मकरंद संगमावर थोडा वेळ बसले, नंतर ते घरीं गेले आणि नंतर जेवण झाल्यावर गोष्टी सांगून ते दोघेजण निजले.

मकरंदाला लवकरच झोप लागली, पण माधवाला बिलकुल झोप येईना. मालती आपणाला मिळणार नाहीं अशी त्याची खात्री झाली. मालतीवांचून आपलें आयुष्य घालविण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें त्याच्या मनानें घेतलें. निराशेच्या भरांत तो उठला. त्यानें आपला पोषाख केला व हातांत आपली तरवार घेऊन तो मकरंदाला किंवा आपल्या माणसांना न कळवितां बाहेर पडला. हिंडत हिंडत तो नगरीच्या बाहेर आला. तो वाटेल तिकडे चालला होता. अंधार गर्द पडला होता. पलीकडे पद्मावतीचें स्मशान दिसत होतें. त्यांतील कांहीं चिता पेटलेल्या होत्या. माधव अत्यंत शूर व धैर्यवान होता. ह्या वेळीं तर तो जिवावर उदार झाला होता. त्याला स्मशानाची किंवा भुताखेतांची बिलकुल भीति वाटत नव्हती.

ह्या स्मशानांतील पिशाचांना मनुष्याचें मांस फार आवडतें असें माधवानें ऐकिलें होतें. त्याला वाटलें, आपलें मांस पिशाचांना दिलें तर परोपकार तरी होईल. तो त्या स्मशानांत जाऊन मोठ्यानें ओरडून म्हणाला, ‘अहो, ज्याला उत्तम नरमांस पाहिजे असेल त्याला मी आपलें मांस देण्याला तयार आहें. स्वतःच्या शरीराचा परोपकारार्थ उपयोग करण्याचें मीं ठरविलें आहे.’ परंतु त्याला कोणींही उत्तर दिलें नाहीं. ह्याच वेळीं कपालकुंडला नांवाची एक कापालिकबाई देवळाकडे चालली होती. तिनें माधवाला पाहिलें व त्याला ओळखलें. ती म्हणाली, ‘हा कामंदकीचा भाचा माधव येथें स्मशानांत येऊन आपलें मांस देण्यास कां तयार झाला आहे कोण

जाणे ! ह्या सुंदर व शूर तरुणावर कोणतें बरें संकट आलें असेल? ' पण कपालकुंडला गर्दींत होती. ह्यामुळें माधवाकडे जास्त लक्ष न देतां ती देवीच्या देवळाकडे गेली. कपालकुंडला अघोरघंटाची प्रिय शिष्या होती.

त्या रात्रीं तिचा गुरु अघोरघंट हा एका सुंदर, तरुण व गुणी कुमारिकेचा देवीला बळी देणार होता. ह्या कुमारिकेचा बळी दिल्यानंतर त्याला एक विलक्षण सिद्धि मिळावयाची होती. मध्यरात्रीला ही पूजा व्हावयाची होती. अघोरघंटानें कपालकुंडलेला पूजेची सर्व तयारी करण्यास सांगितलें होतें व ' मध्यरात्रीं एका कुमारिकेला बळी देण्याकरितां मी घेऊन येतों, तोंवर तूं पूजेची तयारी करून देवळांत बस ' असें तिला बजाविलें होतें. त्याप्रमाणें पूजेच सर्व साहित्य घेऊन कपालकुंडला आली होती. ती तें सर्व साहित्य घेऊन देवळांत गेली व गुरूची वाट पाहात बसली.

अघोरघंट आकाशांतून उडत शहरांत गेला. ह्या दिवशीं अमात्य भूरिवसूच्या घरीं मालतीच्या साखरपुड्याची गडबड सुरू होती. मध्यरात्रीच्या सुमारास सर्व कांहीं आटोपून चाकर मंडळी झोपीं गेली. मालती आपल्या सख्यांसह गच्चीवर निजली होती. मध्यरात्रीच्या सुमारास तिचा डोळा लागला. ह्याच वेळीं अघोरघंट आकाशांतून उडत चालला होता. त्यानें मालतीला पाहिलें. ही सुंदर मुलगी बळी देण्यास योग्य असें समजून तो गच्चीवर उतरला व मंत्रसामर्थ्यानें मालतीस घेऊन तो आकाशांत उडाला. तो थोड्याच वेळांत त्या देवळांत आला. अघोरघंट व कपालकुंडला ह्यांनीं मालतीला सावध केलें. तिला त्यांनीं सांगितलें, 'मुली, तूं मोठी भाग्यवान आहेस. तुला आम्ही देवीला बळी देणार आहों.' मालती हा देखावा पाहून अगदीं घाबरून गेली. तिच्या तोंडांतून शब्दही निघेना.

कपालकुंडलेनें मालतीच्या कपाळावर कुंकवाचा मळवट भरला, तिच्या गळ्यांत लाल फुलांची माळ घातली. अघोरघंटानें तिला

देवीसमोर उभी केली. तेव्हां सर्व धैर्य एकवटून मालती ओरडली, 'अहो बाबा, धावा, धावा, मला हे बळी देत आहेत. मला बळी दिल्यावर राजाची मर्जी तुम्ही कशी सांभाळाल?'

माधव देवळापासून थोड्या अंतरावर उभा होता. त्याच्या कानांवर हे शब्द पडले. त्यानें हे शब्द ज्या बाजूनें येत होते तिकडे दृष्टि फेकली. त्या अंधारांतही त्याला तें देवीचें देवालय दिसलें. ह्या देवालयांत कापालिक लोक रात्रीस येतात हें त्याला माहीत होतें. कापालिक लोक कोणातरी कुमाराला अथवा कुमारीला बळी देत असावे अशी शंका त्याला आली. कांहीं पावलें तो पुढें गेला, तेव्हां त्याला पुढील शब्द ऐकूं आले. 'बाबा, आतां तुम्ही राजाची मर्जी कशी सांभाळाल? आई, माझ्या मृत्यूमुळें तुला अनिवार दुःख होईल. भगवती कामंदकी, तुम्हीं मला प्रेमानें आजपर्यंत पाळलें. माझ्या सुखाकरितां तुम्ही सतत झटलां; माझ्या मृत्यूमुळें तुम्हांला अत्यंत दुःख होईल. सखे लवंगिके, आतां तुझी माझी भेट फक्त स्वप्नांतच होईल.' माधवानें तिचे शब्द ऐकतांच ही मालती आहे असें तेव्हांच ओळखलें. तो धावतच देवळाकडे गेला.

मालतीला देवीसमोर उभी करून कपालकुंडला व अघोरघंट ह्यांनीं देवीच्या प्रार्थनेचे मंत्र म्हटले. कपालकुंडला मालतीला म्हणाली, 'मुली, तुला जें कोणी माणूस अत्यंत प्रिय असेल त्याची आठवण कर; कारण तुझा अंतकाळ अगदीं जवळ आला आहे. आतां तूं ज्याची आठवण करशील त्याचा सहवास तुला स्वर्गांत निरंतर होईल.' मालती म्हणाली, 'महाभागा माधवा, जरी ही मालती तुम्हांला सोडून स्वर्गलोकीं जात आहे, तरी हिची आठवण करीत जा. ज्या माणसाची त्याचे प्रियजन आठवण करितात तें खरोखर जिवंतच असतें.'

अघोरघंटानें आपली तलवार उपसली व तो मालतीवर वार करणार, इतक्यांत माधव झपाट्यानें आंत आला व त्यानें त्याचा



माधव झंपाट्यानें आंत आला व त्यानें अघोरघंटाचा हात वरच्यावर धरला.

हात वरच्यावर धरला आणि तो अघोरघंटाला म्हणाला, 'दुष्टा, खबरदार! तुझें मरण जवळ ओढवलें आहे!' त्याला पाहतांच मालतीनें 'महाभागा, माझें रक्षण कर.' असें म्हणून माधवाला मिठी मारली. माधवानें तिला धीर दिला. तो म्हणाला, 'महाभागे, मरणाच्या वेळीं तूं ज्याचें स्मरण केलेंस तो हा तुझा सखा तुझ्याजवळ उभा आहे. आतां भिण्याचें कांहीं कारण नाहीं. ह्या दुष्टाचा मृत्यु जवळ आला आहे. पण तूं येथें कशी आलीस? ह्या दुष्टाच्या तावडींत कशी सांपडलीस?' मालती म्हणाली, 'मी गच्चीवर निजलें होतें. जागी झालें' तों हे दुष्ट माझ्याभोंवतीं उभे आहेत असें मला दिसलें. पण एवढ्या रात्रीं तुम्ही इकडे कोणीकडे?' माधव म्हणाला, 'तूं मला मिळणार नाहींस अशी माझी खात्री झाली आणि पिशाचांना आपलें मांस देऊन देहाचा शेवट करावा, म्हणून मी ह्या स्मशानांत आलों.'

माधव आपल्याकरितां देहत्याग करणार होता, हें ऐकून मालतीला वाईट वाटलें. अघोरघंटाला आपल्या पूजेंत अडथळा आलेला पाहून संताप आला. त्यानें कपालकुंडलेला विचारलें, 'हा तरुण कोण आहे?' तिनें हा मालतीचा सखा माधव आहे असें सांगितलें. अघोरघंट माधवाला म्हणाला, 'हे ब्राह्मणाच्या पोरा, तुला जिवंत राहावयाचें असल्यास येथून चालता हो. नाहींतर ह्या पोरीबरोबर तुझाही देवीला बळी देईन.'

माधव म्हणाला, 'तुझ्यासारख्या दुष्टाच्या धमकावणीला भिणारा मी नाहीं. सुंदर, सुकुमार, निरपराधी अशा कुमारिकेला मारणाऱ्या, तझा मृत्यु जवळ आलेला आहे.'

ते ह्याप्रमाणें बोलत आहेत इतक्यांत देवळाच्या आसपास मशाली दिसूं लागल्या. भूरिवसूच्या स्वारांनीं देवळाला वेढा घातला. मालती नाहींशी झाली ही बातमी भूरिवसूनें ताबडतोब कामंदकीला कळविली. तेव्हां हें अघोरघंटाचें काम आहे असें

तिनें ताबडतोब ओळखलें व भूरिवसूला स्मशानांत जलदीनें स्वार धाडण्यास सांगितलें. त्या स्वारांनीं देवळासही वेढा दिला.

भूरिवसूचे स्वार पाहतांच माधवानें मालतीला त्यांच्या स्वाधीन केलें व आपण अघोरघंटाशीं युद्ध केलें. अघोरघंट हा धिप्पाड, शक्तिमान व योद्धा होता. दोघांची कांहीं वेळ निकराची लढाई झाली व तींत माधवानें मोठ्या सफाईनें अघोरघंटाचें शिर उडविलें.

ह्या लढाईनंतर मालती स्वारांबरोबर घरीं गेली व माधवही आपल्या घरीं परतला.

★

— ५ —

## गुप्त बेत

मालतीला आपण एवढ्या पराक्रमानें वांचविलें, तेव्हां भूरिवसु आपला सत्कार करील व मालती आपणाला देईल अशी माधवाला फार आशा होती, पण ती निष्फळ ठरली. ह्या मधल्या विघ्नानें तर कांहीं दिवसांनीं मालतीच्या लग्नाची तयारी जोरानें सुरू झाली. माधवाची फार निराशा झाली. पण कामंदकीनें त्याला पुष्कळ धीर दिला व स्वस्थ राहाण्यास सांगितलें. अखेरीस लग्नाची तिथि आली. संध्याकाळीं गोरज मुहूर्तावर लग्न लागावयाचें होतें. नंदनाच्या घराण्यांत अशी चाल होती, कीं भावी वधूनें नंदनाची कुलदेवता जी लक्ष्मी देवी, तिची लग्नाच्या आधीं पूजा करावी, देवालयांत नवीन वस्त्रें व अलंकार धारण करावे व नंतर ह्या वधूचा नंदन घराण्यांतील वराशीं विवाह व्हावा. हें देवीचें देवालय गांवाबाहेर होतें. तें नंदन घराण्याचेंच देवालय असल्यामुळें तेथें दुसऱ्या कोणाचा उपसर्ग होत नसे.

सुमारें पांच वाजण्याच्या सुमारास मालती व भूरिवसूच्या घरची मंडळी वाजत गाजत ह्या देवळांत आली. देवालयांत वधू, वधूकडील वडील स्त्रिया व तिच्या सख्या ह्यांशिवाय दुसऱ्या कोणास जाण्यास बंदी होती. मालती हत्तीवर बसून आली होती. तिनें तोंडावर बुरखा घेतलेला होता. देवालयाजवळ येतांच ती खालीं उतरली. लवंगिका व ती देवालयाच्या गाभाऱ्यांत शिरली. कामंदकी तेथेंच होती. ती लवंगिकेला म्हणाली, 'तुम्ही दोघी आंत जा. पूजेची सर्व तयारी करून ठेवलेली आहे. नंदनाकडून मालतीला आलेले दागिने व वस्त्रें घेऊन मी लवकरच येतें.'

मालती व लवंगिका देवीच्या गाभाऱ्यांत गेल्या. मालतीची अत्यंत निराशा झाली होती. ती नम्र व आज्ञाधारक असल्यामुळें आईबापांच्या सांगण्याप्रमाणें मुकाट्यानें वागत होती. लवंगिका म्हणाली, 'सखे मालती, ह्या माळा गळ्यांत घाल. हें कुंकू व हळद लाव व हें पूजेचें साहित्य घेऊन देवीची पूजा कर.'

मालती म्हणाली, 'सखे, ह्या माळा व ही पूजा मला ताप देतात. मला आतां ह्या आयुष्यांत मृत्यूशिवाय कशाचीही इच्छा नाहीं.' लवंगिका म्हणाली, 'इडा पिडा टळो! ह्या मंगलकालीं तूं भलतेंच कांहीं बोलूं नको!'

मालती ह्या देवालयांत संध्याकाळीं पूजेला येणार ही गोष्ट कामंदकीला माहीत होती. तिनें भूरिवसूच्या संमतीनेंच, पण अत्यंत गुप्तपणें एक बेत ठरविला. तो लवंगिका, बुद्धिरक्षिता, अवलोकिता व भूरिवसु ह्यांखेरीज इतरांना माहीत नव्हता. मालती येण्याच्या पूर्वींच माधव, मकरंद व त्यांचा विश्वासू सेवक कलहंस ह्यांना गुप्तपणें देवीच्या देवळांत येण्यास कामंदकीनें सांगितलें होतें. मालती व लवंगिका ज्या वेळीं गाभाऱ्यांत बोलत होत्या, त्या वेळीं माधव, मकरंद व कलहंस तेथेंच खांबांच्या आड उभे होते व ते ह्या दोघींचें भाषण ऐकत होते.

मालती म्हणाली, ‘सखे लवंगिके, माझें एक काम कर, म्हणजे मी सुखानें मरेन. तूं महाभाग माधवाकडे जा व त्यांना सांग, कीं ह्या हतभागी मालतीची आठवण तुम्हांला राहूं द्या. ह्या मालतीकरितां तुम्ही आपल्या आयुष्याचा नाश करूं नका व दुःख करूं नका. सखे, तूं माझ्या मरणाच्या आड येऊं नको. मी तुझ्या पायां पडतें, ’ असें म्हणून ती तिच्या पायां पडली. गाभाऱ्यांत जवळ जवळ अंधारच होता. मालतीचे डोळे पाण्यानें भरलेले होते. ह्यामुळें तिला पुढचें कांहीं दिसत नव्हतें.

ह्या वेळीं लवंगिकेनें माधवाला खूण केली व माधव लवंगिकेच्या जागीं उभा राहिला. अर्थातच ही गोष्ट मालतीच्या लक्षांत आली नाहीं. मालती म्हणाली, ‘सखे लवंगिके, तूं मला मरणाला परवानगी दे. मला आतां जगण्यांत सुख वाटत नाहीं. मरणापूर्वीं तुला मला भेटूं दे. मग मी सुखानें मरेन.’ नंतर तिनें माधवाला लवंगिका समजून त्याच्या गळ्यांत बकुळीच्या फुलांची माळ घातली. पूर्वीं उद्यानांत माधवानें ही माळ गुंफून तिला दिली होती व ती माळ मालती मोठ्या प्रेमानें आपल्या गळ्यांत घालीत असे. तिचे डोळे अश्रूंनीं भरल्यामुळें तिला माधव दिसला नाहीं. त्याला मिठी मारल्यानंतर ती म्हणाली, ‘सखे लवंगिके, आज तुझा हा स्पर्श मला फार निराळाच वाटत आहे. मरणापूर्वीं महाभाग माधवाची भेट व्हावी अशी मला फार इच्छा होती. तूं त्याला भेट व ही बकुळीची माळ त्याला परत दे.’ इतक्यांत तिनें वर पाहिलें, तों तिला माधव दिसला. ती म्हणाली, ‘अगबाई ! मला लवंगिकेनें फसविलें !’

लवंगिका म्हणाली, ‘सखे मालती, ज्याला तुला भेटण्याची इच्छा होती, त्याच्याच गळ्यांत तूं माळ घातलीस. हा विवाह-विधीचा पहिला भाग झाला. आतां पुढील विधि करून माधवाची भार्या हो.’

२.९.७७
१९४१

वडील माणसांना न विचारतां आपण हें साहस करीत आहोंत म्हणून मालतीला फार भीति वाटत होती. इतक्यांत कामंदकी तेथें आली. तिनें तिला धीर दिला व ती म्हणाली, 'वत्से, ज्यावर तुझें इतकें गाढ प्रेम आहे, त्या माधवाला वरण्यास कां भितेस ?' माधवाकडे वळून ती म्हणाली, 'वत्सा माधवा, ह्या माझ्या लाडक्या कन्येचा हा हात मी तुझ्या हातांत देतें. तूं ह्याचा स्वीकार कर.' माधव म्हणाला, 'भगवती, ही आपली मजवर मोठी कृपा आहे. मी ह्याचा मोठ्या आनंदानें स्वीकार करतों.' नंतर कामंदकी मालती-माधवांना उद्देशून म्हणाली, 'वत्सा माधवा, वत्से मालती, मी सांगतें तें नीट लक्षांत धरा. पतिपत्नी एकमेकांचे अत्यंत प्रिय मित्र असतात. पतिपत्नी ह्या नात्यांतच सर्व नातीं येतात. पतीनें पत्नीला व पत्नीनें पतीला आपला अत्यंत मौल्यवान् ठेवा असें समजावें. फार काय सांगूं! पतीनें पत्नीला व पत्नीनें पतीला स्वतःचा जीवच असें समजावें.'

मालती व माधव ह्या दोघांनींही सांगितलें, 'भगवती, आपल्या उपदेशाप्रमाणें आम्ही नेहमीं वागूं.'

कामंदकी माधवाला म्हणाली, 'ह्या मालतीवर माझा सारा जीव. हिला तुला मीं दिली आहे. तिला प्राणांप्रमाणें जप. ह्यापरतें काय सांगूं ?' हें बोलत असतांना तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या होत्या. तिनें आपल्या भगव्या वस्त्रानें आपले अश्रु पुसले. ती म्हणाली, 'वत्सांनो, ह्या पलीकडच्या वाटेनें तुम्ही माझ्या आश्रमांत जा. तेथें तुमच्या विवाहाची मीं सर्व तयारी केली आहे. तेथें पुढील विधी उरकून टाका.' नंतर ती मकरंदाला म्हणाली, 'मकरंदा, मालतीला नंदनाकडून आलेलीं हीं वस्त्रें व हे दागिने तूं परिधान कर.'

मकरंद पलीकडे गेला. त्यानें तो मालतीचा पोषाख व ते दागिने अंगावर घातले व तो परत आला. तो जात्या फार सुंदर होता व

त्या पोषाखांत एखाद्या तरुणीप्रमाणें फारच सुंदर दिसूं लागला. त्याला मिठी मारून माधव म्हणाला, 'ही सुंदर मालती दृष्टीस पडण्याला नंदनानें मोठीच तपश्चर्या केली असली पाहिजे!' इतक्यांत माधवाला शंका आली व भीति वाटली. तो कामंदकीला म्हणाला, 'ह्या एकंदर प्रकरणांत माझ्या ह्या प्रिय मित्रावर संकट तर येणार नाहीं ना?' कामंदकी म्हणाली, 'त्याची काळजी तुला कशाला पाहिजे?'

माधव ह्यावर कांहीं बोलला नाहीं. तो व मालती मागील दारानें निघून गुप्त वाटेनें कामंदकीच्या आश्रमांत गेलीं. मकरंदानें तोंडावर बुरखा घेतला. त्याच्याबरोबर लवंगिका होतीच. ही नाटकी मालती हत्तीवर बसून वाजत गाजत नंदनाच्या घरीं लग्नाकरितां गेली!

★

— ६ —

## नंदनाची पत्नी

मकरंद हा मालतीच्या वेषांत नंदनाच्या घरीं गेला. हें लग्न अगदीं गाजावाजा न करितां व्हावयाचें असल्यामुळें फारशी मंडळी जमली नव्हती. नंदनाचें हें कांहीं पहिलें लग्न नव्हतें. मालती आजारी आहे, ह्या सबबीवर तिला कोणाला भेटूं दिलें नाहीं व तिला कोणी भेटलेंही नाहीं. शिवाय ह्या कृत्रिम मालतीच्या बरोबर लवंगिका व बुद्धिरक्षिता असल्यामुळें मकरंदाचें सोंग बाहेर फुटलें नाहीं. रात्रीं नंदन स्वतः मालतीची समजूत करण्याकरितां आला. आपल्यासारख्या प्रौढ व द्वितीय वराबरोबर लग्न करण्यास मालती नाखूष होती हें त्याला माहीत होतें. मालतीचें

माधवावर प्रेम होतें हेंही त्याला माहीत होतें. पण लग्न झाल्यावर ती मागील गोष्ट विसरून जाईल व आपल्यावर प्रेम करील अशी त्याची खात्री होती.

तिची मनधरणी करण्याकरितां ती जेथें बसली होती त्या खोलींत तो गेला. तो आपल्या श्रीमंतीच्या व वैभवाच्या गोष्टी तिला सांगूं लागला. पण ती कांहींच बोलली नाहीं. तेव्हां त्याला राग आला व 'तुझी वर्तणूक चांगली नाहीं, तुझें वाईट वर्तन पद्मावतींतील सर्व लोकांना माहीत आहे, तुझें कुलशील वाईट आहे,' इत्यादि अनेक कटु शब्द त्या कृत्रिम मालतीला तो बोलला. मकरंदानें कांहीं न बोलतां त्याला एक चांगली गचांडी दिली. त्याबरोबर तो कोलमडून पडला व तोंडानें शिव्या देत बाहेर पडला. त्यानें आपली फजिती दुसऱ्या कोणास सांगितली नाहीं. फक्त मद्यंतिकेला 'मालतीनें माझा फार अपमान केला' असें त्यानें सांगितलें.

मद्यंतिकेचा व मालतीचा स्नेह होता. तथापि आपल्या भावाचा झालेला अपमान तिला कसा सहन व्हावा? मालतीचें व माधवाचें प्रेम होतें ही गोष्ट तिला माहीत होती; तथापि लग्न झाल्यावर मालती तें सर्व विसरून जाईल अशी तिची खात्री होती. तिला आपल्या घराण्याचा व भावाचा असा अपमान केलेला पाहून मालतीचा फार राग आला व तिची चांगली खरडपट्टी काढण्याकरितां ती मालतीच्या खोलींत गेली.

नंदनाला बाहेर घालविल्यावर मद्यंतिका मालतीला रागें भरण्याकरितां येईल, हें लवंगिकेला व बुद्धिरक्षितेला माहीत होतेंच. त्यांनीं मकरंदाला डोक्यावरून पांघरूण घेऊन स्वस्थ निजण्यास सांगितलें. मद्यंतिका रागारागानें खोलींत आली. पण लवंगिकेनें खूण करून 'मालतीला झोंप लागली आहे, तूं मोठ्यानें बोलूं नकोस' असें सांगितलें व त्या पलंगाजवळील दुसऱ्या पलंगावर त्या तिघीजणी हळुहळू बोलत बसल्या.

मद्यंतिका लवंगिकेला म्हणाली, 'बाई ग, मालतीनें आपल्या पतीचा अपमान केला ही गोष्ट चांगली केली नाहीं.' लवंगिका म्हणाली, 'तुला माहीत आहे, मालती ही फार हळव्या स्वभावाची आहे. तिच्या इच्छेविरुद्ध हें लग्न झालेलें आहे हेंही मी तुजपासून चोरून ठेवीत नाहीं. मालतीच्या मनाला आज फार खिन्नता आलेली आहे. दोनचार दिवसांत तिचें मन शांत होईल व ती आपल्या सासरीं प्रेमानें वागूं लागेल. पण सर्व गोष्टी धिमेपणानें घेतल्या पाहिजेत. नुकत्याच लग्न लावलेल्या आपल्यां पत्नीला 'तूं वाईट चालीची आहेस, तुझें घराणें वाईट आहे,' असें म्हणणें तुझ्या भावाला उचित होतें काय? मालतीला आपण आजच का ओळखत आहोंत? अर्थातच तुझ्या भावाचे शब्द तिला फार झोंबले. ती एकसारखी रडत होती. नुकताच तिचा डोळा लागला आहे.'

मद्यंतिका म्हणाली, 'दादानें ही गोष्ट फार वाईट केली; पण सखे, तुला माहीत आहे, कीं साऱ्या गांवांत मालतीच्या माधवावरील प्रेमासंबंधानें बातमी पसरली आहे, आणि ह्या लोकांत पसरलेल्या बातमीमुळेंच माझ्या दादाच्या तोंडून तसे शब्द निघाले असतील. मी असें बोलतें म्हणून मालतीला सांगूं नकोस. आपण प्रत्यक्ष मालती-माधवाच्या प्रेमाची एक गोष्ट कांहीं दिवसांमागें पाहिली आहे.'

लवंगिका म्हणाली, 'कोणती बरें? मला ती आठवत नाहीं.'

मद्यंतिका म्हणाली, 'मागें कृष्ण चतुर्दशीला आपण शिवालयांत गेलों होतों. त्या वेळीं माझ्यावर वाघानें झेप घातली. इतक्यांत तो महाभाग मध्यंतरीं आला व आपला जीव धोक्यांत घालून त्यानें मला सोडविलें. वाघाच्या हल्ल्यामुळें तो महाभाग मूर्च्छित पडला. इतक्यांत तुम्ही सर्वजण तेथें आलां. तो महाभाग सावध झाला. ती वार्ता मालतीनें मूर्च्छित झालेल्या माधवाला सांगितली. मग माधव सावध झाला. त्या वेळीं तो म्हणाला, 'ह्या शुभवार्तेबद्दल मी आपला प्राण व अंतःकरण मालतीला अर्पण करीत आहें.' म्हणून

मी म्हणतें, मालतीनेंही आपल्या पतीशीं अशा प्रकारें वागावयास नको होतें.'

लवंगिकेला तिच्या ह्या भाषणाचा राग आला. मदयंतिका म्हणाली, 'सखे, रागावूं नकोस.'

लवंगिका म्हणाली, 'तें आतां असूं दे. पण सखे मदयंतिके, तुझ्या लग्नाचें कधीं ठरणार? तुला कोणाला द्यावयाचें ठरलें आहे काय? सखे, खरेंच सांग, तुझें कोणावर प्रेम बसलें आहे काय? सखे, सांगावयाला लाजूं नकोस. आपण येथें तिघी सख्याच आहोंत.'

मदयंतिका म्हणाली, 'सख्यांनो, काय सांगूं! त्या महाभागानें त्या दिवशीं मला काळाच्या दाढेंतून वांचविलें तेव्हांपासून त्या शूर तरुणाला मीं आपला देह व मन हीं देऊन टाकलीं आहेत. त्या पुरुषाशिवाय दुसऱ्या कोणालाही मी वरणार नाहीं. त्याची मूर्ति माझ्या हृदयांत निरंतर वास करीत आहे.'

बुद्धिरक्षिता बुद्ध्याच म्हणाली, 'सखे, त्याचें नांव काय बरें?'

मदयंतिका म्हणाली, 'मकरंद.'

हें नांव घेतांना तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले!

बुद्धिरक्षिता म्हणाली, 'मदयंतिके, समज मकरंद ह्या क्षणीं येथें आले, तर तूं काय करशील?'

मदयंतिका म्हणाली, 'ह्या अभागिनीला त्या थोर पुरुषाचें दर्शन कसचें होणार! तथापि मला तें प्रिय दर्शन झालें, तर मी एकसारखें त्या महाभागाकडे पाहत राहीन.'

बुद्धिरक्षिता म्हणाली, 'सखे, कृष्णानें ज्याप्रमाणें रुक्मिणीचें हरण करून तिच्याशीं विवाह लावला, तसें जर मकरंदानें केलें, तर तूं काय करशील?'

मदयंतिका म्हणाली, 'माझें एवढें भाग्य कोठचें? तूं कांहीं तरी भलतीच आशा लावीत आहेस.' बुद्धिरक्षिता म्हणाली, 'समज,

तो तुला बळेंच विवाहाला नेऊं लागला, तर तूं काय करशील?'
मदयंतिका म्हणाली, 'त्या महाभागानें हा देह वांचविला अर्थात्
हें शरीर त्याचेंच आहे. त्याजवर माझी सत्ता नाहीं.'



'अगवाई हें काय?'

डोक्यावर शाल घेऊन पडलेला मरकंद हें सर्व लक्षपूर्वक ऐकत
होता. तो शाल फेकून देऊन उठला. त्यानें मदयंतिकेचा हात धरला.

मद्‌यंतिकेला वाटलें, कीं मालतीची झोप पुरी होऊन ती जागी झाली आहे. तीं म्हणाली, ‘ सखे मालती, तुझी झोप पुरी झाली ना ? ’ पण जरा निरखून पाहिल्यावर तिला आपली चूक कळून आली. ‘ अगबाई ! हें काय ? ’ असे शब्द आश्चर्यानें एकदम तिच्या तोंडांतून बाहेर पडले.

मकरंद म्हणाला, ‘ महाभागे, ज्याच्या गुणांची तूं इतका वेळ स्तुति केलीस, ज्याला वरण्याचें तूं आनंदानें कबूल केलेंस तो हा तुझा सखा येथें उभा आहे. ’

बुद्धिरक्षिता म्हणाली, ‘ सखे, तूं ह्या महाभागाशीं लग्न करण्याचें आतांच कबूल केलेंस. ज्या मंगल समयाची तूं वाट पाहत होतीस तो हा मंगल समय ठेपला आहे. ह्या वेळेस जिकडे तिकडे शांत आहे. तुझ्या भावाच्या घरची सर्व मंडळी निजली आहेत. शहरांतही जिकडे तिकडे शांत आहे. तर तूं आपल्या पायांतील नुपूर काढून घे व आवाज न करतां आपण शहराच्या बाहेर भगवती कामंदकीच्या मठांत जाऊं. मालतीनें ज्याप्रमाणें माधवाशीं विवाह केला त्याचप्रमाणें तूंही मकरंदाशीं विवाह कर. ’

मद्‌यंतिका म्हणाली, ‘ सखी मालतीनें साहस केलें ना ? ’

बुद्धिरक्षिता म्हणाली, ‘ होय. मालतीचा विवाह झाला आहे. आतां तुझा व्हावयाचा आहे. आतांच तूं म्हणालीस ना, कीं हें शरीर माझें नाहीं, मकरंदाचेंच आहे. मग आतां विवाहाला उशीर कां लावतेस ? ’

बुद्धिरक्षितन मद्‌यंतिकेची पुष्कळ समजूत केली. मकरंदानें धीर दिला. तेव्हां मदयंतिका त्यांच्याबरोवर जाण्यास कबूल झाली. मग ती सर्व मंडळी मागील दरवाजानें बाहेर पडली. त्या वेळीं मध्यरात्र उलटून गेली होती.

इकडे माधव व म[illegible]रवाटेनें कामंदकीच्या आश्रमांत गेलीं.

तेथें त्यांच्या विवाहाची सर्व तयारी केलेली होती. अवलोकिता व कलहंस हीं तेथें अगोदरच आलीं होतीं.

मालती अतिशय आज्ञाधारक व विनयशील मुलगी होती. माधवाच्या प्रेमानें व कामंदकीच्या आज्ञेनें तिनें माधवाशीं विवाह लावला, तरी आपण हें भयंकर साहस करीत आहों, आपल्या वडिलांना ही गोष्ट आवडणार नाहीं, ते आपणावर रागावतील असें तिला वाटत होतें. ह्यामुळें ती अगदीं मुकी बसली होती. माधवानें तिची पुष्कळ समजूत घातली, तिला पुष्कळ धीर दिला, तथापि तिची भीति कमी झाली नाहीं. अवलोकितेनें तिच्या मनाला धीर देण्याचा प्रयत्न केला, पण एखाद्या दुसऱ्या वाक्याशिवाय ती कांहींच बोलली नाहीं.

मकरंदानें तिचा वेष घेऊन नंदनाला फसविण्याचा बेत केला होता. तो कितपत सिद्धीस जाईल व मकरंद सुखरूप परत कसा येईल ह्याचीही तिला काळजी वाटत होती. जसजशी रात्र पडत चालली तसतशी तिची भीति वाढतच गेली. अखेर तिच्या सांगण्यावरून माधवानें कलहंसाला नंदनाच्या घरीं तेथील बातमी आणण्यास धाडलें.

इकडे मकरंद, मदयंतिका, बुद्धिरक्षिता, लवंगिका व कलहंस कामंदकीच्या आश्रमाकडे परत येत असतांना, शहरांतील शिपायांनीं मकरंदाला हटकलें व त्या सर्वांना थांबविलें. आडदांड शिपाई मकरंदाला शिवीगाळ करूं लागले. त्यामुळें मकरंदाची व त्यांची लढाई जुंपली. ह्या स्त्रिया घाबरून तेथेंच उभ्या राहिल्या. कलहंस धावतच कामंदकीच्या आश्रमांत गेला व त्यानें त्या कलहाची बातमी माधवाला सांगितली. माधव आपली तलवार घेऊन मित्राच्या रक्षणार्थ धावत गेला. माधव व मकरंद ह्यांनीं मोठा पराक्रम करून शिपाई लोकांचा मोड केला. ह्या मारामारीची बातमी राजाच्या कानांवर गेली. परदेशाच्या दोघां विद्यार्थ्यांवर आपल्या शिपायांनीं एकदम हल्ला करून मारामारीला प्रारंभ [illegible] ही गोष्ट राजेसाहेबांना पसंत पडली नाहीं व दोन विद्यार्थ्यांनीं प[illegible]शिपायांचें कांहीं चालं

दिलें नाहीं, हें पाहून त्यांना कौतुक वाटलें. त्यांनीं त्या विद्यार्थ्यांना कामंदकीच्या आश्रमांत जाऊं देण्याची परवानगी दिली व 'तुमच्या पराक्रमानें मी संतुष्ट झालों आहें' असें त्यांना राजेसाहेबांनीं कळविलें. तेव्हां सर्व मंडळी मोठ्या आनंदानें आश्रमांत आली.

माधवानें मदयंतिकेचें स्वागत केलें व तो मालतीला हाका मारूं लागला. पण मालती कोठेंच सांपडली नाहीं. ह्या सर्व मंडळींनीं मालतीचा पुष्कळ शोध केला, पण ती कोठेंच दिसली नाहीं. ह्यामुळें सर्व मंडळी फार काळजींत पडली. ही बातमी माधवानें कामंदकीस कळविली. तिनेंही चोहोंकडे शोध केला, पण मालतीचा कोठेंच पत्ता लागला नाहीं.

अघोरघंटाला मारल्यानंतर माधवानें कपालकुंडलेला ती स्त्री आहे म्हणून सोडून दिलें. आपल्या गुरूचा माधवानें वध केला व आपली पूजा बिघडविली, म्हणून कपालकुंडलेला त्याचा अतिशय राग आला व तिनें माधवाचा सूड घेण्याची प्रतिज्ञा केली. ती कामंदकीच्या आश्रमाच्या आसपास फिरत होती. कापालिक लोक फार कपटी व खुनशी असत. त्यांना अदृश्य होण्याची विद्या माहीत होती. माधव मकरंदाला मदत करण्याकरितां जेव्हां आश्रमांतून बाहेर पडला, तेव्हां त्या आश्रमांत एकटी मालतीच राहिली. ही संधि साधून कपालकुंडला तेथें आली. तिला पाहून मालतीला फार भीति वाटली व ती माधवाला हाका मारूं लागली. कपालकुंडला दांत ओठ खाऊन म्हणाली, 'कारटे, तुझ्यामुळें माझा गुरु मारला गेला. आतां खुशाल त्या दुष्ट माधवाला हाका मार. तो कशाचा येतो ? मी तुला आतां येथून घेऊन जातें व पर्वतावरून खालीं ढकलून देतें. मग तुझे राईराई एवढे तुकडे होतील. तूं मेलीस म्हणजे तो दुष्ट कारटा माधवही तुझ्याकरितां जीव देईल. मग माझ्या जिवाला समाधान वाटेल.' असें म्हणून तिनें मालतीवर झडप घातली व तिला घेऊन ती आकाशांत उडाली. ती श्रीपर्वतावर गेली. तेथें मांत्रिक लोकांची वसति होती.

★

— ७ —

## प्रतिज्ञा पुरी झाली !

मालती नाहींशी झालेली पाहून सर्वांना अतिशय दुःख झालें. भूरिवसूनें ठिकठिकाणीं शिपाई पाठवून मालतीचा शोध केला. कापालिक लोकांनीं मालतीला पळवलें अशी सर्वांची खात्री झाली व हे लोक अत्यंत दुष्ट व खुनशी असल्यामुळें मालतीला त्यांनीं बळी दिलें असावें असेंच सर्वांना वाटलें.

मालतीच्या आईला व बापाला आपल्या एकुलत्या एक मुलीचा अशा प्रकारें शेवट व्हावा, हें पाहून फार दुःख झालें. भूरिवसु शोकानें अत्यंत विव्हल झाला. राजानें त्याचें पुष्कळ सांत्वन केलें, पण त्याचें दुःख कांहीं कमी झालें नाहीं.

कामंदकीच्या दुःखाला तर पारावार नव्हता. मालती रांगूं लागल्यापासून तिचा तिला लळा लागला होता. तिनें मालतीला आपल्या पोटच्या मुलीपेक्षां जास्त प्रेमानें वागविलें होतें. तिनें संन्यास घेतला होता, संसार सोडला होता, तरी मालतीकरितां ती संसारांत पडली होती. मालतीच्या सुखाकरितां आपल्या वैराग्याला अयोग्य अशा अनेक मसलती तिनें केल्या. मालतीवांचून तिला क्षणभरही चैन पडत नसे. तिला आतां मालतीच्या लहानपणापासूनच्या सर्व गोष्टी आठवूं लागल्या व तिच्या डोळ्यांतून अश्रूंची सारखी धार लागली.

माधवाची स्थिति तर वेड्यासारखी झाली. 'मालती, मालती' करीत तो नगरीबाहेरच्या रानावनांतून हिंडत होता. त्याच्या बरोबर त्याचा प्रिय मित्र मकरंद होता. तो आपल्याकडून त्याला

धीर देण्याचा प्रयत्न करीत होता. पण अशा प्रसंगीं तो तरी माधवाचें समाधान कसें करणार !

अखेरीस मालतीच्या बापानें अग्निकाष्ठें भक्षण करण्याचा निश्चय केला. त्यानें अग्निही प्रदीप्त केला. माधवानेंही पर्वतावरून खालीं उडी टाकून आयुष्याचा शेवट करण्याचा निश्चय केला. तो मकरंदाला म्हणाला, 'मित्रा, तूं मदयंतिकेबरोबर विवाह कर व सुखी हो. या तुझ्या दुर्दैवी मित्राची तुला आठवण राहूं दे.' मकरंद म्हणाला, 'माधव, ही गोष्ट शक्य आहे का? तूं व मी बालपणापासून एकत्र वाढलों, एकत्र खेळलों. आपण एकत्र अभ्यास केला. आपण एकमेकांना कधींही सोडलें नाहीं आणि आतां तुला सोडून मी जिवंत राहूं व सुख भोगूं, ही गोष्ट शक्य तरी आहे काय? जिकडे तूं तिकडे मी. तूं जर स्वर्गाला निघालास, तर तुझ्याबरोबर येण्यास हा तुझा मित्रही तयार आहे.'

मालतीवांचून लवंगिका दुःखानें विव्हळ झाली. बालपणापासून ह्या दोघी एकत्र वाढल्या, एकत्र खेळल्या. मालतीशिवाय तिला चैन पडेना. ती मदयंतिकेला म्हणाली, 'सखे मदयंतिके, माझ्या प्रिय सखीवांचून जगणें मला अशक्य आहे. मी आतां आपल्या ह्या जिवाचा कोणत्या तरी उपायानें शेवट करीन. तूं महाभाग मकरंदाला वर व सुखी हो.' पण मदयंतिका तें कबूल करीना. ती म्हणाली, 'तुमच्या सर्वांची जी गत तीच माझी. तुम्हांला अशा स्थितींत टाकून मी सुख भोगणें शक्य नाहीं.'

इकडे मालतीला घेऊन आकाशमार्गानें कपालकुंडला श्रीपर्वतावर गेली. तिनें मालतीला आपल्या मठांत नेलें व तिला पर्वताच्या कड्यावर उभी करून ती म्हणाली, 'दुष्ट पोरी, मी तुला आतां चामुंडेला बळी देत आहें. आतां तूं एकदा आवडत्या माणसांची आठवण कर, म्हणजे पुढच्या जन्मीं तुला त्यांचा चिरकाल सहवास मिळेल.'

आपला मृत्यु जवळ आला असें पाहून मालतीला अतिशय वाईट वाटलें. ती म्हणाली, 'बाबा, तुमची मीं फार निराशा केली. तुम्हांला फसवून मीं माधवाशीं विवाह केला ह्याची मला क्षमा करा. माधवा, माझ्यामुळें तुम्हांला अतिशय दुःख भोगावें लागलें. आतां तुम्हीं ह्या अभागी मालतीला विसरून जा. भगवती कामंदकी, तुम्ही मला स्वतःच्या मुलीपेक्षां जास्त प्रेमानें वाढविलें. माझ्या सुखाकरितां तुम्ही फार झटलां, पण दैवाला तें सहन झालें नाहीं. माझ्या वियोगानें तुम्हांला फार दुःख होईल.'

कपालकुंडला मालतीला पर्वतावरून ढकलून देण्यापूर्वी देवींचे मंत्र म्हणूं लागली. इतक्यांत तेथें एक तापसी आली. तिला पाहून कपालकुंडला चपापली व तिनें तिला नमस्कार केला. त्या तापसीनें मालतीला विचारलें, 'मुली, तूं कोण? आणि भगवती कामंदकीचें व तुझें नातें कोणतें?' त्यावर मालतीनें आपली सर्व हकीकत तिला सांगितली. ती ऐकल्यावर त्या तापसीनें तिला पोटाशीं धरलें व म्हटलें 'बाळ, तूं कांहीं काळजी करूं नकोस.' कपालकुंडलेला ती म्हणाली, 'ही मुलगी माझी आहे. तिला मीं आपल्या ताब्यांत घेतली आहे.' त्या तापसीला नमस्कार करून कपालकुंडला निराश होऊन निघून गेली. त्या तापसीनें मालतीला आपल्या आश्रमांत नेलें. तिला स्नान घालून फराळास दिलें. नंतर तिला तेथें ठेवून आकाशमार्गानें उडून ती पद्मावतीकडे निघाली. मालतीनें तिला माधवाला व मकरंदाला ओळखतां यावें म्हणून त्यांच्या सर्व खाणाखुणा सांगितल्या.

माधव हा पद्मावतीजवळील वनांत हिंडत होता. तो दुःखानें अगदीं बेहोष झाला होता. मधून मधून तो मूर्च्छित पडे. आपल्या मित्राची ही अवस्था पाहून मकरंदाला अतिशय वाईट वाटलें. अशा प्रकारें आपल्या मित्राच्या यातना पाहण्यापेक्षां आपण प्राणत्याग करावा असें त्याला वाटलें व जवळच्या नदीच्या डोहांत उडी

टाकण्याचा निश्चय करून तो नदीकडे गेला. तो खडकावर उभा राहून उडी टाकणार, तोंच त्या तापसीनें त्याचा हात धरला. ती त्याला म्हणाली, 'हे तरुणा, तुझें नांव मकरंदच ना?' मकरंद म्हणाला, 'तोच मी दुर्दैवी मकरंद. मालती नाहींशी झाल्यामुळें माझा मित्र वेड्यासारखा झाला आहे. तो दुःखानें मूर्च्छित पडला आहे. त्याचें दुःख मला पाहवत नाहीं, म्हणून मी या डोहांत उडी घेत आहें.' ती तापसी म्हणाली, 'मकरंदा, असें करूं नकोस. मालती खुशाल आहे. तिचा निरोप घेऊन मी आलें आहें. चल आपण माधवाकडे जाऊं व त्याला सावध करूं.' तीं दोघे माधवाकडे गेलीं. माधव सावध होऊन शोक करीत बसला होता. इतक्यांत त्याच्या हातांत त्यानें पूर्वी गुंफलेली व मालतीच्या गळयांत असलेली बकुलांच्या फुलांची माळ तापसीनें टाकली. ती पाहून त्याला आनंद झाला. मकरंद त्याच्याजवळ आला. त्या तापसीनें त्याला झालेली सर्व हकीकत सांगितली व मजबरोबर मालतीकडे चल व तिला भेट म्हणजे आपण तिघेही पुन्हा येथें येऊं असें ती त्याला म्हणाली. माधवानें म्हटलें, 'भगवती, मी आपल्याबरोबर येण्यास अत्यंत आनंदानें तयार आहें.' असें तो म्हणतांच त्याला घेऊन ती तापसी आकाशांत उडाली. मकरंद ही आनंदाची बातमी सांगण्यास कामंदकीकडे गेला.

कामंदकी, लवंगिका व मदयंतिका ह्या एका डोंगरावर बसल्या होत्या. कामंदकीनें डोंगरावरून उडी टाकून आयुष्याचा शेवट करण्याचें ठरविलें. लवंगिका व मदयंतिका ह्या 'आपणही देहाचा शेवट करणार' म्हणून आग्रह धरून बसल्या. कामंदकी त्यांची समजूत घालीत होती, पण त्यांची समजूत कांहीं पटेना. अखेरीस त्या तिघीही त्या पर्वताच्या कडेवरून खालीं उडी मारण्यास तयार झाल्या. इतक्यांत मालती व माधव आकाशमार्गानें खालीं उतरलीं. त्यांना पाहून त्या सर्वांना आनंद झाला. इतक्यांत मकरंदही तेथें आला. माधव त्या तापसीचें वर्णन करूं लागला व ती

आपल्याबरोबर येत असतांना मध्यंतरींच नाहींशी झाली असें त्यानें सांगितलें.

त्यांचा आनंद फार थोडा वेळ टिकला. कारण भूरिवसूचा एक चाकर धावत तेथें आला व त्यानें सांगितलें कीं राजानें व नंदनानें किती जरी सांगितलें तरी न ऐकतां भूरिवसूनें नद्यांच्या संगमावर अग्नि प्रदीप्त केला व तो अग्निप्रवेश करीत आहे. तुम्हांला हें सांगण्याकरितां धावत धावत मी आलों आहें. ही बातमी ऐकतांच मालती दुःखानें मूर्च्छित झाली. भूरिवसूला मालतीच्या कुशलतेची बातमी कळण्याच्या पूर्वी तो अग्निप्रवेश करील अशी सर्वांना भीति वाटली. आतां काय करावें हेंच कोणाला कळेना. सर्वजण दुःखानें व भीतीनें स्तब्ध बसले. इतक्यांत ती पूर्वीची तापसी आकाशांतून उतरली. मालती आतां सावध झाली होती. ती म्हणाली, 'आत्या, जिनें मला काळाच्या मुखांतून वांचविलें तीच ही तापसी.'

त्या तापसीनें कामंदकीला नमस्कार केला व ती म्हणाली, 'भगवती कामंदकी, ही तुमची सखी व शिष्या सौदामिनी तुम्हांला वंदन करते.' कामंदकीनें 'वत्से ये व मला भेट' म्हणून तिला मिठी मारली.

सौदामिनी म्हणाली, 'मी मालती व माधव ह्यांसह आकाशमार्गानें येत असतां संगमावर पेटलेला अग्नि पाहिला. तेव्हां ह्या दोघांना येथें सोडून मी तावडतोब तिकडे गेलें. अमात्य भूरिवसूला मालतीच्या कुशलतेची वार्ता सांगितली. त्या वेळीं सर्वांना अतिशय आनंद झाला. राजानें माधवाला हें पत्र स्वतःच्या हातानें लिहून दिलें आहे.'

माधवानें तें पत्र वाचलें.

'वत्सा माधवा, तुझ्या शौर्यानें व गुणांनीं आम्ही प्रसन्न झालों आहों. मालतीला तूं योग्य वर आहेस. तुझा थोर कुळांत जन्म



अनुक्रम २६
दिनांक

झालेला आहे. तुम्हां सर्वांवरील संकट नाहींसं झालेलें पाहून आम्हांला आनंद वाटत आहे. ह्या मंगल प्रसंगीं आम्ही आपल्या नंदन सचिवाची बहीण मदयंतिका ही तिजवर प्रेम करणाऱ्या तुमच्या मित्राला अर्पण करीत आहों. तुम्हांला आमचा व नंदनाचा पूर्ण आशीर्वाद आहे.’

हें पत्र वाचून त्या सर्वांचा आनंद द्विगुणित झाला. कामंदकीनें आपण, सौदामिनी, भूरिवसु व देवरात एकाच विद्यालयांत कसे अभ्यास करीत होतों, एकमेकांचा कसा दृढ स्नेह होता हें सांगितलें. भूरिवसूनें व देवरातानें आपल्या मुलांचा विवाह करण्याची कशी प्रतिज्ञा केली होती व आपण आणि सौदामिनी ह्यांनीं ह्या विवाहाच्या कामीं साहाय्य करण्याचें कसें वचन दिलें होतें तें सर्व मंडळीला सांगितलें. सौदामिनीनें मालतीला इतक्या प्रेमानें कां वागविलें व मालती-माधवाच्या विवाहाच्या कामीं इतकें साहाय्य कां केलें ह्याचा आतां साहजिकपणेंच उलगडा झाला.

लवकरच माधव व मालती आणि मकरंद व मदयंतिका ह्यांचे मोठ्या थाटानें विवाह झाले. देवरात, भूरिवसु, कामंदकी व सौदामिनी हीं अनेक वर्षांनीं एकत्र जमलीं. पूर्वीची प्रतिज्ञा पुरी झालेली पाहून त्या चौघांनाही फार आनंद झाला.

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 25667
विभाग का.वा.
क्रमांक 7667
नों. दि. 3-7-91
म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
क्र. 3680 नों. दि.
वि. का.वा.